cmyk

दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र | वर्ष – ४ | अंक–२८९ | मंगळवार, दि.११ फेब्रुवारी २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने– ६ | किंमत ३ रूपये




## संपादकीय

### व्यवस्थापन तंत्राचा आणखी एक मोठा विजय

भाजपसाठी दिल्ली हे छोटेसे राज्य सुद्धा खूप महत्त्वाचे होते आणि ते अपेक्षेप्रमाणे त्यांनी जिंकून दाखवले आहे. हा भाजपच्या निवडणूक व्यवस्थापन तंत्राचा आणखी एक मोठा विजय आहे, ज्याने संपूर्ण भारताला आश्चर्यचकित करून ठेवले आहे. भाजपच्या निवडणूक तंत्रापुढे कोणाचीही डाळ शिजत नाही, असे वाटावे इतके घवघवीत यश भाजप प्रत्येक राज्यात मिळवत चालला आहे. दिल्लीने त्यांचे मनोबल आणखी उंचावले आहे.

# सीसीआय १५ मार्चपर्यंत कापूस खरेदी करणार

पुणे । प्रतिनिधी

खुल्या बाजारात कापसाचे भाव कमी असल्याने सीसीआयला चांगला कापूस मिळत आहे. बाजारात येणाऱ्या कापसापैकी जास्तीत जास्त कापूस सीसीआय खरेदी करत आहे. आतापर्यंत देशात सीसीआयने ८७ लाख गाठींची खरेदी केली. त्यापैकी ३९ लाख गाठी कापूस महाराष्ट्रात खरेदी झाला. कापूस मिळाला तर सीसीआय १५ मार्चपर्यंत कापूस खरेदी करेल, असे सीसीआयच्या अधिकाऱ्यांनी सांगितले.

## आतापर्यंत देशात ८७ लाख गाठी कापसाची खरेदी

सीसीआयची खरेदी जास्त झाल्याने काही भागात कापूस साठवण्याची समस्या होती. त्यामुळे काही भागात काही दिवस कापूस खरेदी बंद करण्यात आली होती. पण आता खरेदी पुन्हा पुर्ववत सुरु आहे, असेही अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले. सीसीआयची कापूस खरेदी १५ मार्चपर्यंत सुरु राहण्याचा अंदाज आहे. सीसीआयच्या निकषात बसणारा कापूस येईपर्यंत खरेदी सुरु राहील. कापसाची आवक नसल्यास खरेदी हळूहळू थांबविण्यात येईल, असेही अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले. सीसीआयने आतापर्यंत ८७ लाख गाठी कापसाची खरेदी केली. मागील संपूर्ण हंगामात जवळपास ३३ लाख गाठी कापसाची खरेदी झाली होती. मागील हंगामात अनेक दिवस खुल्या बाजारात हमीभावाच्या दरम्यान कापसाचा भाव होता. त्यामुळे सीसीआयला कमी कापूस मिळाला. मात्र यंदा सुरुवातीपासूनच कापसाचा भाव हमीभावापेक्षा कमी आहे. त्यामुळे शेतकरी पान २ वर



### सीसीआयची ४६ टक्के खरेदी

देशातील बाजारात ७ फेब्रुवारीपर्यंत १८७ लाख गाठी कापसाची शेतकऱ्यांनी विक्री केली. त्यापैकी सीसीआयने तब्बल ८७ लाख गाठी कापूस खरेदी केला. म्हणजेच आतापर्यंत बाजारात विक्रीसाठी आलेल्या कापसापैकी सीसीआयने तब्बल ४६ टक्के कापूस खरेदी केला आहे.

# आजपासून १२ वीची परीक्षा; राज्यात १५ लाख विद्यार्थी

मुंबई । प्रतिनिधी

जानेवारी महिना संपताच विद्यार्थ्यांना ओढ लागलेली असते ती १२ वीच्या परीक्षेची. आता मंगळवार पासून बारावीची परीक्षा सुरू होत असून, ११ फेब्रुवारी ते १८ मार्च २०१५ कालावधीत बारावीची परीक्षा होत आहे. यंदाच्या वर्षी परीक्षेत एकूण १५ लाख ५ हजार ३७ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली असून त्यामध्ये ८ लाख १० हजार ३४८ मुले, तर ६ लाख ९४ हजार ६५२ मुली आहेत. यंदा ३७ तृतीयपंथी नागरिकही परीक्षेसाठी बसले आहेत.

राज्यात एकूण १० हजार ५५० कनिष्ठ महाविद्यालयातील या विद्यार्थ्यांची नोंदणी झालेली असून, या परीक्षेसाठी संपूर्ण राज्यातील विद्यार्थ्यांसाठी ३ हजार ३७३ मुख्य केंद्रावर परीक्षा आयोजित करण्यात आली आहे. विज्ञान शाखेला ६८ हजार ९६७ विद्यार्थी, कला शाखेला तीन लाख ८० हजार ४१० विद्यार्थी, वाणिज्य शाखेला तीन लाख १९ हजार ४३९ पान २ वर

### राज्यात २७१ भरारी पथके

परीक्षा काळात संभाव्य गैरप्रकारांना आळा बसावा या दृष्टीने मंडळामार्फत संपूर्ण राज्यात २७१ भरारी पथके नेमण्यात आले आहेत. याशिवाय दक्षता समिती कार्यरत असून, विभागीय मंडळात विशेष भरारी पथके स्थापन करण्यात आले आहेत.

# पंकजा मुंडे-सुरेश धसांमध्ये आष्टीवरुन वाद पेटला

## आष्टीवर जास्त प्रेम करावे लागेल–पंकजा मुंडे; शिट्टी अन् घड्याळावाल्यांवरच प्रेम करा–आ. सुरेश धस

बीड । प्रतिनिधी

भाजप नेत्या व मंत्री पंकजा मुंडे आणि आ. सुरेश धस यांच्यातील राजकीय वाद पुन्हा पेटला आहे. महायुतीत परळी राष्ट्रवादी कॉंग्रेसकडे गेला असला तरी आष्टी भाजपकडे आहे. त्यामुळे यापुढे आष्टीवर जास्त प्रेम करावे लागेल, आष्टीत जास्तीत जास्त यावे लागेल, असा सुचक इशारा भाजप नेत्या व मंत्री पंकजा मुंडे यांनी दिला. त्यावर आ. सुरेश धस यांनी पलटवार केला आहे. पंकजा ताईंनी मुळ मतदार संघावर जास्त लक्ष द्यावे. तिकडे सर्व हायजॅक झाले आहे. तुम्ही आष्टीतील शिट्टी आणि घड्याळावाल्यांवरच प्रेम करा, असे प्रत्युत्तर दिले.

विधान सभा निवडणुकीचा निकाल लागल्यावर विजयी मिरवणुकीतच आ. सुरेश धस यांनी भाजप नेत्या पंकजा मुंडे यांच्यावर भीमराव





धोंडे यांना मदत केल्याचा गंभीर आरोप करीत हल्लाबोल केला होता. भारतीय जनता पक्षातील दोन नेत्यांमधील मतभेद पुन्हा समोर आले आहे. भाजप नेत्या आणि पर्यटन मंत्री पंकजा मुंडे यांनी भाजप आमदार सुरेश धस यांच्या मतदार संघात सोमवारी सभा घेतली. या सभेत आपले आष्टीवर विशेष लक्ष असणार आहे. आष्टीवर जास्त प्रेम करावे लागणार असून यापुढे जास्तीत जास्त इकडे यावे लागेल, असे पंकजा मुंडे म्हणाल्या. पंकजा मुंडे यांच्या पान २ वर

### काय म्हणाले सुरेश धस?

सुरेश धस म्हणाले, आष्टीवर त्यांनी गेल्या निवडणुकीत खूप प्रेम केले होते. आजच्या कार्यक्रमातही त्यांचे ज्याच्यावर प्रेम असतील ते लोकच त्या ठिकाणी आले असतील. या कार्यक्रमात शिट्टीवाले, घड्याळ्यावाले हजर असतील. एकवेळा तुम्ही कॅमेरा उपस्थित लोकांवर फिरवा. शिट्टी आणि घड्याळवाल्यांवर तुम्ही प्रेम करा, आष्टीतील भाजपच्या कार्यकर्त्यांवर आणि भाजपच्या लोकांवर प्रेम करण्यास मी समर्थ आहे. त्यांनी त्यांच्यावर प्रेम करु नये, अशी माझी विनंती आहे.

### नवा पक्ष काढण्याच्या विधानावरुन पंकजा मुंडेंचा युटर्न

मी म्हटले की मुंडे साहेबांवर प्रेम करणाऱ्या लोकांचा साठा केला तर वेगळा पक्ष उभा राहील. पक्ष उभाच आहेना भाजप. मुंडे साहेबांनी सुरुवातीपासून पक्षासाठी काम केले, आणि तो उभा केला आहे. मुंडे साहेबांवर लोक प्रचंड प्रेम करतात. अशा अर्थाने मी ते वाक्य बोलले. ज्या पक्षात जीवनाचा प्रत्येक क्षण त्यांनी घातला. त्याच पक्षात त्यांनी शेवटचा विसावा घेतला. लगेच एका चॅनलने चालवले, पंकजाताई म्हणाल्या, पक्ष स्थापन करणार, आता मी काय वेडी आहे का? वेगळा पक्ष स्थापन करायला. अरे मी वेगळा पक्ष कसा स्थापन करेल? दिल्लीत मोदी आहेत, इथे फडणवीस आहेत. खाली वर दोन्हीकडे आमची सत्ता आहे. मी मंत्री आहे. मग मी असे कशामुळे करेल असे पंकजा मुंडे यांनी म्हटले आहे.

# पीएम मोदी फ्रान्स, अमेरिका दौऱ्यावर

नवी दिल्ली : पंतप्रधान नरेंद्र मोदी सोमवारी फ्रान्स आणि अमेरिकेच्या दौऱ्यासाठी रवाना झाले. १० फेब्रुवारी ते १२ फेब्रुवारी असा तीन दिवसांचा पंतप्रधान मोदी यांचा फ्रान्स दौरा असेल. त्यानंतर त्यांचा २ दिवसांचा अमेरिका दौरा आहे. अमेरिकेत डोनाल्ड ट्रम्प यांची राष्ट्राध्यक्ष म्हणून निवड झाल्यावर पंतप्रधान मोदींचा हा पहिलाच दौरा आहे. या दोन देशांच्या दौऱ्यावर रवाना होण्यापूर्वी पंतप्रधान मोदी यांनी जारी केलेल्या निवेदनानुसार, फ्रान्सच्या भेटीदरम्यान ते पॅरीसमध्ये एआय शिखर परिषदेत सहभागी होणार आहेत.पंतप्रधान मोदी म्हणाले की, फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष मॅक्रॉन यांनी दिलेल्या निमंत्रणानुसार मी १० ते १२ पान २ वर

# एफआरपीवरून कोर्टाने सरकारवर ओढले ताशेरे

## अंतिम निर्णय आज होण्याची शक्यता

मुंबई । प्रतिनिधी

उसाची एफआरपी ३ टप्प्यात देण्याच्या निर्णयावर माजी खासदार राजू शेट्टी यांनी २०२२ साली याचिका दाखल केली होती. यावर सोमवारी (दि.१०) याची सुनावणी झाली. उच्च न्यायालयाने सरकारची चांगलीच कानउघाडणी करत अंतिम निर्णय मंगळवार (दि.११) रोजी लागण्याच अंदाज आहे. सरकारला या सुनावणीबाबत गांभीर्य नसल्याचेही कोर्टाने म्हंटल्याची माहिती शेट्टी यांनी दिली.

महाविकास आघाडीने केलेल्या ३ टप्प्यातील एफआरपी कायद्याच्या विरोधात याचीका दाखल करण्यात आली होती. याची सोमवारी सुनावणी झाली यावर माजी खासदार राजू शेट्टी म्हणाले की, ''सुनावणी पहिल्याच सत्रात असल्याने आम्ही सर्वजण उपस्थित होतो. सरकारकडून यावर निर्णय पान २ वर

# सुरेश धस अन् आव्हाडांमध्ये पुन्हा जुंपली

## माफीचे वक्तव्य धसांच्या आले अंगलट; सर्वस्तरातून टिकेची झोड

बीड । प्रतिनिधी

परभणी प्रकरणी माफीचे वक्तव्य आ. सुरेश धस यांच्या चांगलेच अंगलट आले असून त्यांच्यावर सगळीकडून टिकेची झोड उठवली जात आहे. तसेच राष्ट्रवादीचे नेते जितेंद्र आव्हाड आणि भाजप आ. सुरेश धस यांच्यामध्ये पुन्हा एकदा जुंपल्याचे पाहायला मिळत आहे. आव्हाड यांनी धसांच्या विधानाचा समाचार घेत मग याच न्यायाने वाल्मिक कराडला पण माफ करायचे का? असा सवाल जितेंद्र आव्हाड यांनी केला. तर सुरेश धस यांनी पुन्हा



एकदा जितेंद्र आव्हाड यांच्यावर जोरदार हल्लाबोल केला आहे. राष्ट्रीय संतांनी अपुऱ्या माहितीच्या आधारे मला शहाणपण शिकवू नये, असा पलटवार केला. पान २ वर

### माझी क्लिप तोडून–मोडून दाखवली–आ. धस

लाँग मार्चमध्ये जमलेल्या आंदोलकांची भूमिका ही पोलिस अधीक्षक, महासंचालक आणि इतर अधिकाऱ्यांना निलंबित करावी अशी होती. पण जे अधिकारी या प्रकरणाचा तपास करत आहेत किंवा कुठेच रेकॉर्डवर नाहीत त्यांच्यावर कारवाई केली तर पोलिस दलाच्या मनोबलावर परिणाम होईल. त्यामुळेच आपण या पोलिसांना माफ करा असे वक्तव्य केले. पण आपली क्लिप ही तोडून–मोडून दाखवण्यात आली, अशी प्रतिक्रिया आ. सुरेश धस यांनी दिली.

### सुरेश धसांनी परभणी प्रकरणात लुडबुड करु नये–खरात

सुर्यवंशी कुटुंबाला न्याय मिळवून देण्यासाठी आंबेडकरी जनता सक्षम असून सुरेश धस यांनी परभणी प्रकरणात लुडबुड करु नये, असे सचिन खरात यांनी म्हटले आहे.



# राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचे महाकुंभात पवित्र स्नान

प्रयागराज । वृत्तसंस्था

महाकुंभमेळ्यात गंगा, यमुना आणि सरस्वती यांच्या संगमावर राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी सोमवारी (दि. १०) पवित्र स्नान केले. त्यांनी त्रिवेणी संगमावर पुजा, प्रार्थना आणि गंगा आरती केली. यावेळी उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ आणि राज्यपाल आनंदीबेन पटेल उपस्थित होत्या. पवित्र संगमावर स्नान करणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. महाकुंभमेळ्याचे अजून १७ दिवस शिल्लक आहेत. सोमवारी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी प्रयागराजमध्ये त्रिवेणी पान २ वर


# 'शिवशाही' या महानाट्यातून स्थानिक कलावंतांनाही देणार अभिनयाची संधी - आ.विजयसिंह पंडित

## स्थानिक कलाकारांनी संपर्क करण्याचे केले आवाहन

गेवराई । प्रतिनिधी

आ. विजयसिंह पंडित यांच्या नेतृत्वाखाली थाटात संपन्न होणाऱ्या 'राष्ट्रवादी शिवजन्मोत्सव २०२५' अंतर्गत 'शिवशाही' या महानाट्याचे आयोजन करण्यात आले असून या महानाट्यात दिग्गज कलावंतांसोबत स्थानिक कलावंतांनाही अभिनय करण्याची संधी दिली जाणार असल्याची माहिती आ. विजयसिंह पंडित यांनी दिली आहे.

सुप्रसिद्ध लेखक – दिग्दर्शक महेंद्र महाडिक यांनी निर्मित केलेल्या 'शिवशाही' या महानाट्यात सुप्रसिद्ध अभिनेत्री अलका कुबल, शंतनू मोघे आदी प्रथितयश कलावंत अभिनय पान २ वर



# बीड शहर सार्वजनिक शिवजयंती उत्सव समितीच्या अध्यक्षपदी सत्येंद्र पाटील, उपाध्यक्षपदी हाजी नसीम इनामदार

बीड । पतिनिधी

बीड शहर सार्वजनिक शिवजयंती उत्सव समितीच्या अध्यक्षपदी आमदार संदीप क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या बैठकीत सर्वानुमते सत्येंद्र पाटील यांची तर उपाध्यक्षपदी हाजी इनामदार यांची निवड करण्यात आली आहे. या निवडीनंतर अध्यक्ष उपाध्यक्ष यांचा प्रमुख पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत स्वागत सत्कार करण्यात आला.



याप्रसंगीराजेंद्र मस्के, अशोक रोमण, प्रा.विजय पवार, मिरगणे सर, माजी प्राचार्य अनंत नखाते सर, ज्येष्ठ शिक्षक नेते कल्याण वाघमारे सर, रामनाथ डाके सर, अप्पासाहेब रसाळ सर बाळासाहेब गोरे, बंडु कदम, झुंजार धांडे, राजेंद्र साळुंके, जयमल्हार बागल, विशाल तांदळे, दिपक हजारे, मिठ्ठन कोटुळे, दत्ता साळुंके, अभय बीडकर, पान २ वर

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.१० फेब्रुवारी २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: १६.०० क्विंटल | ३,१८९ | ३,३५० | ३,२६९ |
| ज्वारी/हायब्रिड : ७१.५० क्विंटल | १,८०० | २,६७१ | २,२८२ |
| मका/लोकल:५.०० क्विंटल | २,२०१ | २,२०१ | २,२०१ |
| तूर : १५४.५० क्विंटल | ६,८०० | ७,४८१ | ७,२७७ |
| उडीद : ६.०० क्विंटल | ५,००० | ६,३०० | ५,६५० |
| बाजरी:५.०० क्विंटल | २,२६६ | २,८०० | २,५३३ |
| मुग : १.५० क्विंटल | ६,५०० | ६,५०० | ६,५०० |
| सोयाबीन: १२३.०० क्विंटल | ३,७८० | ४,०५० | ३,९९२ |
| हरभरा: ७२.०० क्विंटल | ५,६५० | ५,८८१ | ५,७४० |

# आरटीई २५ टक्क्यांची प्रवेश यादी शनिवारी लागणार




## विद्यार्थ्यांच्या हस्ते काढली ऑनलाइन सोडत, राज्यभरातून ३ लाख ५ हजार १५९ अर्ज

पुणे । प्रतिनिधी

शिक्षण हक्क कायद्यांतर्गत (आरटीई) खासगी शाळांमधील २५ टक्के राखीव जागांवरील प्रवेशासाठी आलेल्या अर्जाची ऑनलाइन सोडत (लॉटरी) सोमवारी विद्यार्थ्यांच्या हस्ते काढण्यात आली. राज्यातील आठ हजार ८६३ शाळांमधील एकूण एक लाख नऊ हजार १११ जागांसाठी तीन लाख पाच हजार १५९ बालकांचे अर्ज आले आहेत. प्राथमिक शिक्षण विभागातर्फे ऑनलाइन सोडत जाहीर झाली असली तरीही पालकांना प्रवेशाच्या निवड यादीसाठी शनिवारपर्यंत (ता.१५) वाट पहावी लागणार आहे.

बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिनियम २००९ पान २ वर

### पालकांनी निर्भयपणे तक्रारी नोंदवाव्यात

'आरटीईअंतर्गत २५ टक्के राखीव जागांवरील प्रवेशाची प्रक्रियाही पूर्णपणे पारदर्शकच होत आहे. त्यामुळे, पालकांनी कोणत्याही प्रलोभनांना बळी पडू नये. आरटीई २५ टक्के राखीव जागांवर प्रवेश देतो, असे कोणी एजंट सांगत असल्यास, त्याची तक्रार त्वरित संबंधित शिक्षणाधिकाऱ्यांकडे करा. त्यांच्या कठोर कारवाई करण्यात येईल.

cmyk

अग्रलेख

# व्यवस्थापन तंत्राचा आणखी एक मोठा विजय

भाजपसाठी दिल्ली हे छोटेसे राज्य सुद्धा खूप महत्त्वाचे होते आणि ते अपेक्षेप्रमाणे त्यांनी जिंकून दाखवले आहे. हा भाजपच्या निवडणूक व्यवस्थापन तंत्राचा आणखी एक मोठा विजय आहे, ज्याने संपूर्ण भारताला आश्चर्यचकित करून ठेवले आहे. भाजपच्या निवडणूक तंत्रापुढे कोणाचीही डाळ शिजत नाही, असे वाटावे इतके घवघवीत यश भाजप प्रत्येक राज्यात मिळवत चालला आहे. दिल्लीने त्यांचे मनोबल आणखी उंचावले आहे. गेल्या दोन निवडणुकांमध्ये आम आदमी पक्षाने एकतर्फी विजय मिळवत आपले नाव निर्माण केले होते. देशातील एकमेव इमानदार आणि चारित्र्यसंपन्न नेता अशी स्वत:ची प्रतिमा निर्माण करण्यात केजरीवाल यांना पहिल्या निवडणुकीतच यश आले होते. लोकपाल आंदोलनामुळे सत्तेत आलेल्या या पक्षाला पहिल्या निवडणुकीत इतर पक्षांच्या कुबड्यांची गरज लागली होती. मध्येच त्यांनी त्या कुबड्या फेकून निवडणुकीला सामोरे जाण्याचे आव्हान स्वीकारले होते. तेव्हापासूनच्या दोन निवडणुकांमध्ये भाजप आणि काँग्रेस या दोन पक्षांचा सुपडासाफ करून दिल्लीने केजरीवाल यांच्याकडे ६७ आणि ६२ इतक्या संख्येने एकतर्फी सत्ता सोपवली होती. २०२० मध्ये केवळ आठ जागा जिंकलेल्या भाजपला दिल्लीकरांनी २०२५ मध्ये ४८ जागांवर विजयी केले आहे. ३९ जागा त्यांच्या वाढलेल्या आहेत तर तेवढ्याच जागा आपच्या कमी झाल्या आहेत. आधीपेक्षा नऊ टक्के मते यावेळी भाजपने तर काँग्रेसने दोन टक्के मते ज्यादा मिळवली. या उलट आपची तब्बल पावणे अकरा टक्के मते घटली.

हा सत्ताविरोधी निकाल म्हणावा की भाजपच्या सर्वत्र यशस्वी होणाऱ्या निवडणूक तंत्राचे यश? यावर मतमतांतरे घडतील. निवडणुकीच्या शेवटच्या टप्प्यापर्यंत केजरीवाल यांनी ती आपल्याभोवती फिरती राहील याची व्यवस्था केली होती. त्यामुळे आम आदमी पक्षाचा इतका मोठा पराभव होईल ज्यामध्ये खुद्द केजरीवाल, मनीष सिसोदिया आणि सत्येंद्र जैन यांचाही पराभव होईल असे कोणाला वाटले नसेल. काँग्रेसचे जे होईल त्याचा साधारण अंदाज होता. मात्र संदीप दीक्षित यांना जितकी मते मिळाली तेवढ्याच म्हणजे तीन ते साडेतीन हजार मतांनी केजरीवाल यांचा पराभव झाला हे विचार करायला लावणारे आहे. काँग्रेस आठ-दहा जागांवर जरी विजयी झाली असती तर आपच्या पहिल्या निवडणुकीत जे पक्षीय बलाबल होते तसे होऊन त्रिशंकू स्थिती निर्माण होण्यास वाव निर्माण झाला असता. मात्र मतदारांनी तितकी संधी काँग्रेसला दिली नाही. परिणामी काठावर सत्ता स्थापनेची संधीही आपला मिळाली नाही. काँग्रेस नेत्यांचे निकालानंतर युती करण्याच्या आवडत्या अडवणुकीच्या राजकारणाचेही मनसुबे उधळले गेले. भारतीय जनता पक्षाचे दिल्लीत पुनरागमन हा त्या पक्षासाठी मोठा शुभ संकेत ठरू शकतो. लोकसभा निवडणुकीनंतर महाराष्ट्राच्या निवडणुकीत त्यांना मिळालेले यश झाकण्याचा प्रयत्न विरोधकांकडून निवडणूक आयोग आणि प्रक्रियेवर आक्षेप घेऊन सातत्याने केला जातोय. त्या काळातील हे यश आहे. शेवटच्या तीन दिवसांमध्ये दिल्लीची निवडणूक केंद्रीय अर्थसंकल्पातील घोषणेमुळे फिरली असे म्हटले जाते ते वावगे नव्हे. आयकर मर्यादेची घोषणा आश्चर्यचकित करणारी आणि भाजपवर रुसलेल्या मध्यमवर्गाला आपला निर्णय बदलण्यास भाग पाडणारी होतीच. फक्त त्याचा प्रभाव कितपत होईल हे पाहण्याची उत्सुकता होती. त्या प्रभावाने भाजपला पुन्हा सत्तेत आणले आहे. जाट बहुल भाग, दलित आणि स्त्रियांची मते यामुळे सर्व दहा लोकसभा मतदारसंघाच्या क्षेत्रात भाजपच्या जागा वाढल्या ही आप आणि केजरीवाल यांच्यासाठी ही मोठी आपटी आहे. उपराज्यपाल आपल्याला काम करू देत नाहीत या टिकेतच त्यांच्या सत्ताकाळाची समाप्ती झाली आहे. पण या निवडणुकीला त्यांनी सर्वस्व हरवल्यासारखे दाखवलेले नाही, हेही या निकालाचे एक वेगळे वैशिष्ट्ये ठरावे.

भाजपला त्यांनी जनतेला दिलेली आश्वासने पूर्ण करण्याचे आवाहन केले आहे. अर्थातच, रुसलेल्या मध्यमवर्गाला खुश करण्यासाठी भाजप सध्या देश पातळीवर वेगवेगळ्या योजना आणण्याच्या तयारीत असताना तिथल्या मध्यमवर्गाला जपण्यास उपयुक्त ठरू शकते. त्यामुळे आपोआपच मध्यमवर्गाचे आणि विशेषत: नव्या युवा वर्गाचे राजकारण करणाऱ्या आम आदमी पक्षासारख्या पक्षासमोर आव्हान उभे राहू शकते.

भाजपला काँग्रेस आणि अन्य पक्षांपेक्षासुद्धा केजरीवाल यांचे आव्हान मोठे वाटते. कारण, हा पक्ष इतर पक्षाहून वेगळा आहे. त्यांना जनतेत जाऊन कार्यकर्ते म्हणून राबायची हौस आहे. सामान्य, सुशिक्षित परिवाराची पार्श्वभूमी असणारे नेते आणि त्यांच्यावर भ्रष्टाचार व इतर मुद्यांद्वारे प्रहार करणे भाजपला मुश्किल होते. मद्य धोरणाने भाजपला तोही आरोप करण्याची संधी मिळाली. प्रदीर्घकाळ या पक्षाचे प्रमुख नेते केजरीवाल, सिसोदिया, जैन, सिंग यांना त्यांनी जेलमध्ये पाठवले. पहिल्या तिघांचाही या निवडणुकीत पराभव झाला आहे. आता या नेत्यांना पक्षांतर्गत विरोध सुरू होईल का? हा मोठा प्रश्न आहे. शिवाय पक्षात इतर पक्षातून आलेला जो वर्ग आहे तो इथे टिकेल का आणि पुन्हा केंद्र सरकार या पक्षातील नेत्यांच्या मागे हात धुवून लागते का? हा महत्त्वाचा मुद्दा असणार आहे.

# बीड, परभणी प्रकरणात धसांची भूमिका दुटप्पी

## • सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानियांचा आरोप



### बावनकुळेंच्या भेटीनंतर भाषा बदलली

धस यांची जी भूमिका आहे ती अचानक कशी काय बदलली? हा माझा त्यांना प्रश्न आहे अचानक ते युटर्न घेताना पाहायला मिळतात. त्यांनी अशा पद्धतीने विधान करणे संकेतांना धरून नाही. मला तर माझ्या खात्रीलायक सूत्रांनी अशी माहिती दिली आहे की, दोन ते तीन दिवसांपूर्वी त्यांची बावनकुळे यांच्या बंगल्यावर एका व्यक्तीसोबत भेट झाली होती आणि त्यानंतर त्यांची भाषा बदलली आहे. त्यांना त्यांची भूमिका बदलायला किंवा सौम्य करण्यास सांगण्यात आले आहे, आणि हेच कारण आहे की त्यांची वक्तव्य सुद्धा आता बदलत चालली आहेत, असा गौप्यस्फोटही अंजली दमानिया यांनी केला आहे.

**मुंबई । प्रतिनिधी**

**बीडमधील सरपंच संतोष देशमुख हत्याकांड व परभणी येथील सोमनाथ सूर्यवंशी यांच्या न्यायालयीन कोठडीत झालेल्या मृत्यूच्या मुद्यावर भाजप आमदार सुरेश धस हे दुटप्पी भूमिका घेत असल्याचा आरोप सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी केला आहे. एवढेच नाही तर त्यांनी एकनाथ शिंदे यांच्या लोकप्रिय योजनांना ब्रेक लावून त्यांना कॉर्नर केले जात असल्याचा दावाही त्यांनी केला आहे.**

दमानिया सोमवारी म्हणाल्या की, सोमनाथ सूर्यवंशी यांची कथितपणे दुर्दैवी हत्या झाली. यात जे अधिकारी दोषी असतील त्यांच्यावर केवळ निलंबनाची कारवाई करून चालणार नाही. त्यांच्यावर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करायला हवा अशी त्यांच्या कुटुंबीयांची मागणी आहे. त्याला माझे पूर्ण समर्थन आहे. केवळ निलंबन करून काय होणार? त्यांना घरबसल्या पगार मिळेल. निलंबनाचा कालावधी संपल्यानंतर त्यांना पुन्हा कामावर घेतले जाईल. कामावर आल्यानंतर ते पुन्हा तसेच करतील. असे चालणार नाही. त्यांच्यावर गुन्हा दाखल झाला पाहिजे. भाजप आमदार सुरेश धस हे परभणीतील सोमनाथ सूर्यवंशी हत्या प्रकरण व बीड येथील संतोष देशमुख हत्याकांड या दोन्ही प्रकरणात दुटप्पीपणा दिसून येत आहे. संतोष देशमुख प्रकरणावर भाष्य करताना ते सातपुडा बंगल्यात खंडणीचा ३ कोटींचा व्यवहार झाल्याचा दावा करतात. पण त्यांनी धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याची मागणी आपली नसल्याचे ते म्हणाले. सूर्यवंशी प्रकरणात एकीकडे ते लाँग मार्चमध्ये सहभागी होतात. पण त्याचवेळी ते पोलिसांवर कोणतेही गुन्हे दाखल न करण्याची विनंती करतात. ही दुटप्पी भूमिका भाजपच त्यांच्या तोंडून वदवून घेत असल्याचा संशय आहे, असे त्या म्हणाल्या.

# प्रत्येक नोटरी विधीज्ञाच्या मागे संघटना ठामपणे उभा आहे- ॲड.सय्यद सिकंदर अली



**जालना । प्रतिनिधी**

जालना जिल्हा वकील संघ तथा महाराष्ट्र आणि गोवा नोटरी संघटनेच्यावतीने भारत सरकार नवनियुक्त नोटरी, ज्येष्ठ नोटरी विधीज्ञ तथा विधीज्ञासाठी कायदेशीर शिबीराचे आयोजन दि. १० फेब्रुवारी २०२५ रोजी जिल्हा वकील संघाच्या कार्यालयात करण्यात आले होते. यावेळी नोटरी विधीज्ञांना ज्येष्ठ विधीज्ञ श्री नितेशजी ललवाणी यांनी नोटरी दस्त नोंदणी बाबत मौल्यवान मार्गदर्शन केले. प्रत्येक नोटरी दस्ताला २५ रुपयाचे नोटरी मुद्रांक टिकीट लावणे व त्याची रजिस्टरमध्ये रितसर खतवणी करणे नियमानुसार गरजेचे आहे. प्रत्येक दस्त करतांना सर्व पक्षकार यांची शहनिशाकरुन त्यांची स्वाक्षरी रजिस्टरवर घेणे गरजेचे आहे. महाराष्ट्र आणि गोवा नोटरी संघटनेचे अध्यक्ष ॲड सय्यद सिकंदर अली यांनी मार्गदर्शन करतांना सांगितले की, दस्त दक्षतेने करा तथा नोटरी वकीलांसाठी नियमीत कार्यशाळा व सुविधा मिळण्यासाठी संघटना प्रयत्नशिल असून प्रत्येक नोटरी विधीज्ञामागे संघटना ठामपणे उभी असल्याचे ग्वाही सुद्धा दिली. यावेळी वकील संघाचे अध्यक्ष ॲड . विकास पिसुरे, बारकाऊन्सील चे समन्वयक ॲड . लक्ष्मण उढाण, उपाध्यक्ष ॲड . कामरानखान, सचिव ॲड . नंदकिशोर पुंगळे, सहसचिव ॲड . शरद कुलकर्णी, जिल्हा सरकारी अभियोक्ता ॲड बाबासाहेब इंगळे, मुख्य लोकअभिरक्षक ॲड . महेश वाघुंडे, ॲड . महेश धन्नावत, ॲड . आनंद झा, प्रसिद्धी प्रमुख ॲड . अरविंद मुरमे, ई. व अनेक विधीज्ञ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# कृषी अधीक्षक कार्यालय जुगाराचा अड्डा

**जालना । प्रतिनिधी**

जालना कृषी अधीक्षक कार्यालय मोतीबाग जवळील या कार्यालय अंतर्गत परिसरात जुगारी खेळत असल्याने पत्ते व दारूच्या बाटल्या पडलेल्या दिसत आहे. याप्रकरणी जिल्हा कृषी अधीक्षक कार्यालयामध्ये थांबत नसल्यामुळे हा प्रकार होत असल्याचे बोलल्या जात आहे. यालाच भारत स्वच्छ अभियान म्हणतात का याप्रकरणी जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी कारवाई करणे अपेक्षित आहे असे बोलल्या जात आहे. सदरील जिल्हा कृषी कार्यालय शेतकऱ्यांसाठी आहे का जुगारासाठी आहे असे बोलले जात आहे. याप्रकरणी कार्यालयांमध्ये कृषी अधीक्षक थांबत नसल्याने याचा गैरफायदा कर्मचारी सुद्धा घेत आहे असे पण दिसून येत आहे. सदरील प्रकरणी जिल्हाधिकारी यांनी अचानक कार्याला भेट देऊन संबंधित विभागाचा पंचनामा करावे असे बोलले जात आहे.

# उपमुख्यमंत्री वैद्यकीय मदत कक्षाची घोषणा!

## एकनाथ शिंदे यांची माहिती; पुन्हा मंगेश चिवटेंकडे सोपवली धुरा



**मुंबई । प्रतिनिधी**

**एकनाथ शिंदे यांचा रविवारी वाढदिवस झाला. त्यानिमित्ताने उपमुख्यमंत्री वैद्यकीय मदत कक्षाची घोषणा करण्यात आली आहे. एकनाथ शिंदे यांनी सोमवारी या कक्षाची माहिती देताना सांगितले की, माझ्या वाढदिवसाचे औचित्य साधत उपमुख्यमंत्री वैद्यकीय मदत कक्षाची घोषणा करण्यात आली. या कक्षाच्या अधिकृत लोगोचे अनावरण माझ्या हस्ते करण्यात आले.**

या कक्षाची जबाबदारी मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीचे माजी कक्षप्रमुख मंगेश चिवटे यांच्याकडे सोपवण्यात आली आहे. राज्याचा सार्वजनिक आरोग्य विभाग व महात्मा फुले जन आरोग्य योजनेशी हा कक्ष संलग्न असणार आहे. त्यामुळे गरजू रुग्णांना याचा मोठा फायदा मिळणार आहे. माझ्या मुख्यमंत्री पदाच्या कार्यकाळात अडीच वर्षात मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्षाच्या माध्यमातून गोरगरीब रुग्णांची अखंडपणे सेवा करण्यात आली, असे उपमुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले. याप्रसंगी केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री प्रतापराव जाधव, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर, परिवहन मंत्री प्रताप सरनाईक, अर्थ व नियोजन राज्यमंत्री आशिष जयस्वाल, शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष प्रमुख मंगेश चिवटे आदी मान्यवर उपस्थित होते.

### आतापर्यंत ४१९ कोटी अर्थसहाय्य वितरित

या कक्षामधून सुमारे ४१९ कोटी अर्थसहाय्य वितरित करण्यात आले, ज्यामुळे ५१ हजार पेक्षा अधिक दुर्धर आजारांनी ग्रस्त रुग्णांचे प्राण वाचण्यास मदत झाली. त्यांच्या आयुष्यात निरामय आरोग्याचा प्रकाश आला. गेल्या ८ वर्षांपूर्वी आम्ही हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाची स्थापना करून आरोग्याच्या महायज्ञाला सुरुवात केली. रुग्ण सेवेचा हाच वसा आणि परंपरा उपमुख्यमंत्री वैद्यकीय मदत कक्षाच्या माध्यमातून आम्ही पुढे घेऊन जात आहोत. यासाठी निस्वार्थीपणे सेवा देणाऱ्या सर्व रूग्णसेवकांना माझ्या मन:पूर्वक शुभेच्छा.

# जि.प.च्या ६७ शिक्षकांना जूनी पेन्शन मंजूर!

**जालना । प्रतिनिधी**

**जिल्हा परिषदे अंतर्गत कार्यरत ६७ शिक्षकांना जुनी पेन्शन योजना मंजूर झाली असून या संदर्भातील आदेश मु.का.अ.वर्षा मीना यांनी काढले आहेत. महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीने केलेल्या पाठपुराव्यास अखेर यश प्राप्त झाल्याबद्दल समितीच्या वतीने सोमवारी( ता. १०) जल्लोष करण्यात आला.**

०१ नोव्हेंबर २००५ पुर्वी जाहिरात प्रसिद्ध होऊन नंतर रूजू झालेल्या शिक्षकांना पेन्शन योजना लागू करावी यासाठी प्राथमिक शिक्षक समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी,शिक्षणाधिकारी , यांच्याकडे वेळोवेळी पाठपुरावा केला होता. निवेदने देऊन लोकशाही मार्गाने आंदोलने ही केली होती. त्यांच्या पाठपुराव्यास अखेर यश प्राप्त झाले. दि. ०५ फेब्रुवारी २०२५ रोजी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी वर्षा मीना यांनी शासन निर्णयानुसार संबंधित शिक्षकांना जूनी पेन्शन योजनेचा लाभ मिळण्यासाठी राष्ट्रीय निवृत्ती वेतन चे खाते बंद करून भविष्य निर्वाह निधी चे खाते उघडावे असे आदेश दिले आहेत.

## पान १वरून...

### सीसीआय १५ मार्चपर्यंत

सीसीआयला कापूस घालत आहेत. परिणामी सीसीआयची खरेदी वाढली आहे. सध्या बाजारात येणारा जास्तीत जास्त कापूस सीसीआयच खरेदी करत आहे. तर खासगी व्यापाऱ्यांना कमी प्रमाणात कापूस मिळत आहे. देशातील कापूस आवक मागील दोन आठवड्यांपासून दीड लाख गाठींपेक्षा कमी झाली आहे. कापूस आवक १ लाख ३० हजार गाठींच्या दरम्यान दिसत आहे. त्यातही महाराष्ट्रातील आवक सर्वाधिक आहे. महाराष्ट्रात मागील आठवडाभरात दिवसाला ४५ ते ५० हजार गाठींच्या दरम्यान कापूस बाजारात विक्रीसाठी आला होता. त्यानंतर गुजरामध्ये आवक आहे. तेलंगणासह दक्षिण भारतातील कापसाची आवक कमी झाली. त्यामुळे सीसीआयची तेथील खरेदीही कमी झाली आहे. महाराष्ट्रातील आवक जास्त असल्याने सीसीआयची खरेदीही जास्त होत आहे. महाराष्ट्रात आतापर्यंत सीसीआयने ३९ लाख गाठी कापसाची खरेदी केली. निकषाप्रमाणे कापूस मिळेल तोपर्यंत सीसीआय कापूस खरेदी करणार आहे. शेतकरी हमीभावाने कापूस विकतील तोपर्यंत सीसीआय खरेदी करणार आहे. सीसीआयची खरेदी १५ मार्चपर्यंत सुरु राहील, असे सीसीआयच्या अधिकाऱ्यांनी सांगितले. मार्चनंतर बाजारातील शेतकऱ्यांची विक्री कमी होईल, असा अंदाज.

---------------

### आष्टीवरुन पंकजा मुंडे-सुरेश

या वक्तव्यावर आष्टीतील भाजप आमदार सुरेश धस यांनी पलटवार केला आहे. तुम्ही तुमचा मतदार संघ सांभाळा, आष्टीकडे लक्ष देण्यास आपण समर्थ आहोत, तसेच निवडणुकीत काय म्हणाल्या होत्या? त्याची आठवणही सुरेश धस यांनी पंकजा मुंडे यांना करुन दिली. भाजपकडे केज हा एकच मतदार संघ असल्याचे त्याच म्हणाल्या होत्या. आता आष्टीकडे लक्ष देण्याची गरज नाही, असे ते म्हणाले.

---------------

### आजपासून १२ वीची परीक्षा;

विद्यार्थी तर किमान कौशल्य आधारित अभ्यासक्रम ३१ हजार ७३५ विद्यार्थी आहेत. टेक्निकल सायन्स ४ हजार ४८६ असे एकूण १५ लाख ५ हजार ३७ विद्यार्थी यंदा परीक्षा देणार आहेत. पुणे, नागपूर, संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर, कोकण या नऊ विभागीय मंडळात ही परीक्षा होणार आहे. महाराष्ट्राचे माध्यमिक उच्च माध्यमिक नव विभागीय मंडळात ही परीक्षा होणार असून, नव विभागीय मंडळात नियंत्रण कक्ष कार्यरत करून हेल्पलाइन सुविधा उपलब्ध करून दिलेली आहे.

----------

### राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचे

संगमात पवित्र स्नान केले. प्रयागराजमध्ये दाखल झाल्यानंतर महापौर उमेश चंद्र गणेश केसरवानी यांनी मुर्मू यांचे स्वागत केले.

-----------

### सुरेश धस अन् आव्हाडांमध्ये

परभणीतील सोमनाथ सुर्यवंशी मृत्यू प्रकरणावरून शरद पवार गट राष्ट्रवादीतील आमदार जितेंद्र आव्हाड यांनी भाजप आमदार सुरेश धस यांच्यावर हल्लाबोल केला. जितेंद्र आव्हाड यांनी केलेल्या एका ट्विटमध्ये, परभणी प्रकरणात पोलिसांवर गुन्हे दाखल व्हावेत हा आग्रह धरू नका, असे सुरेश धस एका व्हिडीओमध्ये बोलताना दिसत आहेत. तर काही गोष्टींमध्ये मोठ्या मनाने माफ करायचे असते, असेही सुरेश धस यांनी म्हटले होते. त्यावरून आव्हाडांनी सुरेश धस यांच्यावर निशाणा साधला आहे. 'मग याच न्यायाने वाल्मिक कराडलाही माफ करायचं का?', असा सवाल जितेंद्र आव्हाड यांनी केला आहे. ज्यांनी सोमनाथला मारले आहे, त्यांना कायद्याचा मार बसेलच; याची खात्री आम्ही देतो. एवढेच जर आपल्यामध्ये क्षमायाचनेचे भाव असतील तर कृपया आपण हिमालयात जाऊन साधूसंत व्हावे आणि वाल्मिक कराडलाही माफ करावे, असा टोला आव्हाड यांनी धस यांना लगावला. तर आव्हाडांनी मला शहाणपण शिकवू नये, राष्ट्रीय संतांनी अपुऱ्या माहितीवर बोलू नये, असा धसांनी पलटवार केला.

------------

### एफआरपीवरून कोर्टाने

देण्यास एवढा विलंब का? अशी विचारणा करत, कोर्टाने थेट सरकारवर ताशेरे ओढले. ''२०२२ च्या गॅझेटला याचिकाकर्त्यांकडून आक्षेप घेण्यात आला आहे, यावर तुमचे म्हणणे काय आहे अशी विचारणा कोर्टाने सरकारला केली. मुख्यमंत्री म्हणतात आम्ही हे गॅझेट मागे घेतले आहे. गॅझेट मागे घेतले तर त्याची अंमलबजावणी का केली नाही. असा सवाल कोर्टाने सरकारला विचारला. यावर सरकारने एक दिवसांची मुदत मागताच कोर्टाने आजच्या आज निर्णय देण्यास सांगितले, असे शेट्टी म्हणाले. 'कोर्टाने दिलेल्या वेळेत सरकारने आपले म्हणणे मांडताना सांगितले की, आम्ही लिगल ओपिनियन घेत आहोत. तत्कालीन सरकारने हा निर्णय घेतला होता. त्यावेळच्या मुख्यमंत्र्यांनी दिलेल्या निर्णयावर आम्ही लिगल ओपिनियन घेत आहोत. आम्हाला वेळ हवा आहे, अशी मागणी सरकारने कोर्टाकडे केली. यावर कोर्टाने सरकारची कानउघाडणी करत एकदा निर्णय झाला असताना तुम्ही लिगल ओपिनियन घेताय म्हणजे इतका वेळ झोपा काढताय का? तत्कालीन मुख्यमंत्री असो किंवा सरकार असो निर्णयात बदल होत नसतात. त्यावेळी घेतलेल्या निर्णयावर तुम्ही म्हणणे मांडा, असे सरकारला सुनावण्यात आले. यानंतर कोर्टाने अंतिम निकाल राखीव ठेवत मंगळवारी (दि.११) जाहीर करणार आहे.'' अशी माहिती शेट्टी यांनी दिली.

-----------

### पीएम मोदी फ्रान्स,

फेब्रुवारी या दरम्यान फ्रान्सला भेट देणार आहे. पॅरिसमध्ये कृत्रिम बुद्धिमत्ताविषयक कृती शिखर परिषदेचे सहअध्यक्षपद भूषविण्यासाठी उत्सुक आहे. या शिखर परिषदेत जगभरातील नेते आणि तंत्रज्ञान क्षेत्रातले जगभरातले अनेक मुख्य कार्यकारी अधिकारी एकत्र येणार आहेत, असे ते म्हणाले. या शिखर परिषदेत कृत्रिम बुद्धिमत्तेचा व्यापक सार्वजनिक हितासाठी सर्वसमावेशक, सुरक्षित आणि विश्वासार्ह पद्धतीने वापर करण्यासंबंधीच्या परस्पर सहकार्याच्या दृष्टिकोनावर विचारांची देवाणघेवाण होणार असल्याचे ते म्हणाले.

-------------

### 'शिवशाही' या महानाट्यातून

करीत असून त्यांच्या सोबत गेवराईच्या स्थानिक कलावंतांनाही अभिनय करण्याची संधी दिली जाणार असून सहभागी कलावंतांना प्रमाणपत्रेही प्रदान केली जाणार आहेत. गेवराई शहर व परिसरातील पाच वर्षापासून साठ वर्षांपर्यंत च्या हौशी कलावंतांनी तथा इच्छुक विद्यार्थ्यांनी मंगळवार, दि. ११ रोजी गेवराईच्या र. भ. अट्टल महाविद्यालयाच्या टेनिस हॉलवर दुपारी १२ वाजता प्रत्यक्ष निवड चाचणी साठी उपस्थित रहावे, असे आवाहन करण्यात आले आहे. यासंदर्भातील अधिक माहितीसाठी हौशी कलावंत तथा इच्छूक विद्यार्थ्यांनी प्रा. बापू घोक्षे - ९४२०८१६६६६, प्रा. शिवाजी दिवाण-९४२३४७००८९, राजेंद्र काळे-९७६७८०२९१३, किशोर सोनवणे-९४२३३५२४०१ या क्रमांकांवर संपर्क साधावा, असे आवाहन राष्ट्रवादी शिवजन्मोत्सव २०२५ च्या कार्यकारिणी कडून करण्यात आले आहे.

-------------

### आरटीई २५ टक्क्यांची प्रवेश

(आरटीई) नुसार खासगी शाळांमधील २५ टक्के राखीव जागांवरील प्रवेशाची ऑनलाइन सोडत सोमवारी जाहीर करण्यात आली. महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेच्या (एससीईआरटी) सभागृहात नवीन मराठी शाळेतील विद्यार्थ्यांच्या हस्ते आणि मान्यवरांच्या उपस्थितीत चिठ्ठ्या काढून ही सोडत काढण्यात आली. यावेळी राज्याचे शिक्षण आयुक्त सचिंद्र प्रताप सिंह, प्राथमिक शिक्षण संचालक शरद गोसावी, शिक्षण संचालक (योजना) महेश पालकर, 'बालभारती'चे संचालक कृष्णकुमार पाटील, एससीईआरटीचे संचालक राहुल रेखावार उपस्थित होते. यावेळी विद्यार्थ्यांनी प्रतिनिधिक स्वरूपात चिठ्ठ्या उचलल्यानंतर प्रत्यक्ष ऑनलाइन सोडत प्रक्रियेस सुरवात करण्यात येते. विद्यार्थ्यांनी चिठ्ठ्या उचलून काढलेल्या नंबरच्या सहाय्याने काही गुणसूत्र वापरून राष्ट्रीय माहिती विज्ञान केंद्रामार्फत (नॅशनल इन्फर्मेटिक्स सेंटर-एनआयसी) सोडत काढली जाते. त्यासाठी तीन-चार दिवसांचा अवधी लागतो. साधारणत: शनिवार पर्यंत एनआयसीमार्फत ऑनलाइन सोडतीचे तांत्रिक काम पूर्ण होईल. त्यानंतर येत्या शनिवारपासून (दि.१५) निवड यादीत असलेल्या बालकांच्या पालकांना प्रवेशाबाबतचे संदेश अर्जात नोंदविलेल्या मोबाईल क्रमांकावर पाठविण्याची प्रक्रिया सुरू होईल, असे गोसावी यांनी सांगितले.

-------

### बीड शहर सार्वजनिक शिवजयंती

सचिन हरनमारे, वल्लभ चिरके, गणेश लोंढे, अभिजीत मसकर, पप्पू लांडे, दत्ता कशिद, सुरेश खुर्णे, वामन घोडके, महेंद्र शिराळे यांच्यासह अनेक शिवप्रेमींची उपस्थिती होती. बीड शहरात गेल्या काही वर्षापासून अत्यंत उत्साहात सार्वजनिक शिवजयंती उत्सव साजरा केला जातो. सबंध बीडकर नागरिक या शिवजयंती सोहळ्यामध्ये सहकुटुंब, सहपरिवार सहभागी होत असतात. यंदाही बीडचा हा सार्वजनिक शिवजयंती उत्सव सोहळा आ. संदीप क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांच्या सर्व सहकारी, पदाधिकारी, मित्र परिवाराच्या वतीने अत्यंत आनंददायी वातावरणात उत्साहात साजरा केला जाणार आहे. या सार्वजनिक शिवजयंती उत्सव समितीच्या अध्यक्ष, उपाध्यक्षांची निवड तसेच शिवजयंतीच्या अनुषंगाने चर्चा व विनिमय करण्यासाठी आणि शिवजयंती उत्सवामध्ये यावर्षीच्या आयोजित कार्यक्रमासंबंधी निर्णय घेण्यासंदर्भात दि. १० फेब्रुवारी रोजी सायंकाळी ६ वाजता शहरातील शासकीय विश्रामगृहात सार्वजनिक शिवजयंती उत्सव समिती कार्यकारिणीच्या व्यापक बैठकीच्या आयोजन करण्यात आले होते. आ. संदीप क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या बैठकीत सर्वानुमते सत्येंद्र पाटील यांची अध्यक्षपदी तर उपाध्यक्षपदी हाजी नसीम इनामदार यांची निवड करण्यात आली आहे. या बैठकीला शिवप्रेमी नागरिकांनी बहुसंख्येने उपस्थित होते.

-----------

cmyk

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

मंगळवार, दि. ११ फेब्रुवारी २०२५



## युसूफवडगांव माध्यमिक विद्यालयाचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात साजरे

युसूफवडगांव । प्रतिनिधी

केज तालुक्यातील युसूफवडगांव येथील युसूफवडगांव माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय युसूफवडगांव यांचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात साजरा करण्यात आले.

यावेळी कार्यक्रमाची सुरूवात राजमाता जिजाऊ, सावित्रीबाई फुले व शिक्षणमहर्षी स्व.द.बा.घुमरे यांच्या प्रतिमांचे पुजन करून करण्यात आली.यावेळी विद्यालयातील मुला-मुलांनी हिंदी-मराठी गाण्यांसह छत्रपती शिवाजी महाराज यांच्या गाण्यांवर अतिशय सुंदर नृत्य सादर केले तर मुलींनी आम्ही शिवकन्या,सावित्रीच्या लेकी व भिमगीतावर गाण्यांवर अतिशय छान असे नृत्य सादर पालकांची मने जिंकली.या कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणुन भालचंद्र शिक्षण संस्थेचे सचिव दिपकदादा घुमरे तर प्रमुख पाहुणे म्हणुन केंद्रप्रमुख अर्जुन बोराडे,पशुवैद्यकिय अधिकारी गुंडाप्पा थळकरी,श्रीमंत खरबड,चेअरमन अरूण चोपणे,उपसरपंच महेश लामतुरे,ग्रा.पं.स दादा निकम,संजय लांडगे,ओमकार लामतुरे,मन्मथ पाटील,विजय राऊत,काशीनाथ खरबड,रूपेश बोरगावकर,अरूण राऊत,महादेव मोडवे,नागनाथ निकम हे उपस्थित होते.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्राचार्य अंकुश भोसले,पर्यवेक्षक राजाभाऊ खरबड सर्व शिक्षकवृंद व कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# नवनिवार्चित आमदारांसाठी दिल्लीत प्रशिक्षण शाळा

## श्रीकांत शिंदेंकडून स्नेहभोजनाचे निमंत्रण ठाकरेंच्या १० आमदारांचा न जाण्याचा निर्णय

मुंबई । प्रतिनिधी

खासदार श्रीकांत शिंदे यांनी दिल्लीत महाराष्ट्रातील सर्व नवनिर्वाचित आमदारांना आज रात्री घरी स्नेहभोजनाचे निमंत्रण दिले आहे. यामध्ये भाजप शिवसेना शिंदे गट आणि अजित पवार गटासह शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार दिल्लीला जाणार नसल्याची माहिती दिली आहे.



विधानसभेच्या नवनिर्वाचित आमदारांसाठी दिल्लीमध्ये प्रशिक्षण शाळेचे आयोजन करण्यात आले आहे. विधीमंडळी सचिवालयाकडून ही प्रशिक्षण शाळा आयोजित करण्यात आली आहे. या प्रशिक्षण शाळेसाठी महाराष्ट्रातील सर्व नवनिवार्चित आमदार दिल्लीत दाखल झाले आहेत. श्रीकांत शिंदे यांनी या नवनिर्वाचित आमदारांसाठी आज रात्री दिल्लीतील घरी स्नेहभोजनाचे निमंत्रण दिले आहे.

श्रीकांत शिंदे यांनी ठाकरे गटाच्या १० आमदारांना देखील स्नेहभोजनाचे निमंत्रण दिल्याची माहिती मिळत आहे. शिवसेना ठाकरे गटाकडून सिद्धार्थ खरात, गजानन लवाटे, संजय देरकर, अनंत (बाळा) नर, हरुन खान, वरुण सरदेसाई, महेश सावंत, मनोज जामसुतकर, बाबाजी काळे, प्रवीण स्वामी हे १० नवनिवार्चित आमदार आहेत. यातील बाबाजी काळे, वरूण सरदेसाई, गजानन लवाटे हे ३ आमदार आपल्याच मतदारसंघात असल्याने प्रशिक्षण शाळेसाठी दिल्लीला गेले नाहीत. तर उर्वरित ७ आमदार दिल्लीत आहेत.

आम्हाला निमंत्रण नाही : उबाठा

ठाकरे गटाच्या सर्व नवनिवार्चित आमदारांनी श्रीकांत शिंदेंचे स्नेहभोजनाचे निमंत्रण नाकारल्याचे समजते. कोणीही स्नेहभोजनासाठी जाणार नसल्याचे माहिती मिळत आहे. तर काही आमदारांनी आपल्याला निमंत्रण मिळाले नसल्याचे म्हटले आहे. एकत्रितरित्या कोणीही स्नेहभोजनाला जाणार नसल्याचे सांगण्यात आले आहे.



# रेशनिंगसाठी उमरद खालसा येथील महिलांची तहसीलदारांकडे धाव

बीड । प्रतिनिधी

रोजी उमरद येथील गावातील महिला पुरुष यांनी मोठ्या संख्येने तहसीलदार याना गावातील रेशन दुकानदार हा मागील ६ महिन्यापासून केवायसीच्या नावाखाली दर महिन्याला थम घेऊन रेशन वाटप करत नसल्याची तक्रार बीड तहसीलदार शेळके यांच्याकडे केली. तसेच असे प्रकार अनेक गावात व शहरातील खूप गरजू कुटुंब रेशनिंग पासून वंचित असल्याची देखील माहिती एकल महिला संघटना च्या रुक्मिणी नागापुरे यांनी तहसीलदार यांना दिली आहे गावातील लोकांना रेशन लाभ न मिळाल्यास मोठ्या संख्येने तहसील कार्यालयावर मोर्चा काढण्यात येईल असे कळवण्यात आले आहे .

## दिपक गिरी यांना चंपावती महोत्सवात बेस्ट डॉन्स टीचरचा आवार्ड पुरस्काराने सन्मानित

गेवराई । प्रतिनिधी

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथजी शिदे यांच्या वाढदिवसानिमित्त बीड येथे महकरडंक चंपावती महोत्सव स्पर्धचे आयोजन करण्यात आले होते आयोजित स्पर्धेत गेवराई येथील द कॅम्ब्रिज शाळेने सहभाग घेतला होता यामध्ये शाळेतील सांस्कृतिक शिक्षक दिपक दादासाहेब गिरी यांना बेस्ट डान्सर आवार्ड मिळाला होता



त्याचे वितरण शिवसेनेचे जिल्हाप्रमुख अनिल दादा जगताप,सचिन मुळीक, स्वप्नील गलधर, दै.लोकशाचे संपादक विजय बंब,उध्दवजी मडके,जयसिंग मामा चुगडे यांच्या हास्ते दिपक गिरी यांना बेस्ट डॉन्स टीचर आवार्डचे वितरण करण्यात आले आहे

याविषय आधिक माहीती अशी की उपमुख्यंमंत्री एकनाथ शिदे यांच्या वाढदिवसानिमित्त चंपावंती महोत्सव महाकरडंक स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते या स्पर्धेत गेवराई येथील द कॅम्ब्रिज स्कुलने सहभाग घेतला होता कलाकारांना घडवण्याचे काम एक गुरु करत असतो त्या गुरुचा सुध्दा सन्मान झाला पाहीजे म्हणून उपमुख्यमंत्री एकनाथजी शिदे यांच्या वाढदिवसानिमित्त चंपावती महाकरडंक स्पर्धेचे दि.१ फेब्रुवारीरोजी उद्धाटन करण्यात आले यामध्ये अनेक स्पर्धाकांनी सहभाग घेतला होता सहभागी स्पर्धाकांना दि.८ रोजी उत्साहात पारदर्शकपणे बक्षीस वितरण पार पडले.

## आजपासुन १२ वी परीक्षा सुरू केंद्राच्या परिसरात १४४ कलम जारी

बीड । प्रतिनिधी

जिल्ह्यात माध्यमिक व उच्च माध्यमिक परीक्षा माहे फेब्रुवारी, मार्च, २०२५ मध्ये होत असून परीक्षेमध्ये गैरप्रकार टाळण्यासाठी, परीक्षा कॉपीमुक्त करण्याकरिता तसेच परीक्षा केंद्राच्या परिसरात शांतता तसेच कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी जिल्हादंडाधिकारी अविनाश पाठक यांनी फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ (२) अन्वये परीक्षा केंद्राच्या १०० मीटर परिसरात दि. ११ फेब्रुवारी, २०२५ ते १८ मार्च, २०२५ या कालावधीत परिक्षेच्या वेळेच्या १ तास आगोदर ते परीक्षा संपेपर्यंतच्या कालावधीत परीक्षा केंद्राच्या परिसरात व परिक्षेचे साहित्य ठेवलेल्या ठिकाणी मनाई आदेश जारी केले आहेत.

परिक्षा शांततेच्या वातावरणात पार पाडण्यासाठी परिक्षा चालू असतांना परीक्ष न देणारे विद्याथी आणि इतर काही घटक परिक्षा केंद्राच्या परिसरात परिक्षा चालू असतांना उपद्रव करित असतात. परिक्षा चालू असतांना कॉपी देण्याचा प्रयत्न करतात तसेच परिसरातील झेराक्स सेंटरचा कॉपी पुरविण्यासाठी दूरूपयोग होण्याची शक्यता लक्षात घेता परिक्षा देणा-य विद्यार्थ्यांना व परिक्षेसाठी नियुक्त अधिकारी ,कर्मचारी यांना बाहेरील व्यक्तींचा त्रास होऊ नये इयत्ता १२ व दहावीच्या परिक्षा केंद्राच्या ठिकाणी व परिक्षा केंद्राच्या १०० मिटर परिसरात फौज्दारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ ( २ ) करण्यात आले आहे.

या परीक्षा केंद्राच्या परिसरात १४४ कलम जारी केला असून परीक्षा केंद्राच्या परिसरात १०० मीटर अंतरापर्यंत शासकीय कर्तव्ये पार पाडणाऱ्या अधिकारी, कर्मचारी, परीक्षार्थी यांच्या व्यवतिरिक्त दोन किंवा त्यापेक्षा जास्त व्यक्ती एकत्र येण्यास, फोटोकॉपी, ई-मेल, इंटरनेट सुविधा, इतर दळणवळण, संदेश वहन साधने तसेच कोणत्याही व्यक्तीजवळ मोबाईल, वायरलेस सेट, कॅल्क्युलेटर, लॅपटॉप, संगणक बाळगण्यास, एस.टी.डी,आय.एस.डी मशिन, ध्वनीक्षेपक वाजविण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे.

शासकीय परिक्षेसंबधीत कर्मचाऱ्यांच्या व विद्यार्थ्यांच्या वाहना व्यतिरीक्त इतर अनाधिकृत वाहनांना परिक्षा केंद्राच्या १०० मिटर परिसरात येण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे. हे आदेश कोणत्याही धार्मिक कार्यक्रम तसेच अंत्ययात्रा यासाठी लागू राहणार नाहीत.

पान ६ वरून...

## अध्यापक महाविद्यालयाचे

श्री. येवले सर, भोसले सर, कारंजकर सर, विधाते सर, गर्जे सर, बनकर सर, यांनी बहिस्थ परिक्षक म्हणून काम पाहिले .

विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी विशेष कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी किरण शिनगिरे, गोकुळ गावडे, अमोल शेलार, सचिन पवार, दीपक बोडके, हनुमान जाधव, पूजा नन्नवरे, कांचन थेटे, शिल्पा घायतडक, गिरमे वनिता, खाडे प्रिती, तांब्रे मीनाक्षी, आदी विद्यार्थी उपस्थित होते. कार्यशाळा उत्स्फूर्तरीत्या संपन्न झाली. विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री संतोष थोरवे यांनी पाठ घेण्यासाठी शाळा उपलब्ध करून दिल्याबद्दल प्राचार्य केदार सर यांनी त्यांचे आभार मानले.

DAILY RAJYA LOKTANTRA DATE-11-02-2025

CHANGE IN NAME

MY OLD NAME WAS

1) MANOJ KAILAS RATHOD

NOW MY NEW NAME **MANOJ KAILASH RATHOD**

ADDRESS

AT.RAMNAGAR TANDA.TQ.AMBAD,DIST.JALNA

(431204)

7666861799

DAILY RAJYA LOKTANTRA DATE-11-02-2025

CHANGE IN NAME

MY OLD NAME WAS

1) KAILASH RATHOD

NOW MY NEW NAME **KAILAS HABU RATHOD**

ADDRESS

AT.RAMNAGAR TANDA.TQ.AMBAD,DIST.JALNA

(431204)

7666861799

DAILY RAJYA LOKTANTRA DATE-11-02-2025

CHANGE IN NAME

MY OLD NAME WAS

1) KAMALBAI KAILASH RATHOD

NOW MY NEW NAME **KAMAL KAILAS RATHOD**

ADDRESS

AT.RAMNAGAR TANDA.TQ.AMBAD,DIST.JALNA

(431204)

7666861799

## घाटनांदुर येथे विश्वकर्मा जयंती साजरी



घाटनांदुर । प्रतिनिधी

येथे विराट श्री विश्वकर्मा यांच्या जयंतीनिमित्त छत्रपती शिवाजी महाराज चौक या ठिकाणी १०फेब्रुवारी रोजी सकाळी ९ वा.विराट श्री विश्वकर्मा यांच्या प्रतिमेचे पूजन ,पुष्पहार, श्रीफळ फोडून अभिवादन करून विश्वकर्मा मंदिर सभागृह घाटनांदुर या ठिकाणी आरती व प्रसादाचे आयोजन करण्यात आले यावेळी सरपंच महेश गारठे,गणेश देशमुख, बाळासाहेब पांचाळ,नरसिंग पांचाळ,रामभाऊ वैद्य,हनुमंत पांचाळ, बालासाहेब राजमाने, प्रदीप वैद्य,संपत पांचाळ, सुरेश जाधव,गोविंद जाधव,नवनाथ पांचाळ,विकी जाधव, शिवम पिंपळे, बाळू पांचाळ,पप्पू आव्हाड, पांडुरंग पांचाळ व सर्व समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सोमेश्वरमधील एनएमएमएस यशवंतांचा सन्मान

घाटनांदूर । प्रतिनिधी

गुणवत्तेसह बहुजणांचे ज्ञानपीठ अमृतमहोत्सवी सोमेश्वर शैक्षणिक संकुलात एनएमएमएस शिष्यवृत्तीत विक्रम घडवणाऱ्या त्रेचाळीस गुणवंतांचा पालकांसह सहृदय सत्कार करण्यात आला.



यावेळी क्रांतीज्योती सावित्रीमाईंच्या प्रतिमेस अभिवादन करुन आणि मंचावरील मान्यवरांचा सत्कार करुन संस्थासचिव अजित देशमुख, केंद्रप्रमुख ए.पी.कोपले, बँक व्यवस्थापक शरद देडे, ॲड.संतोष पवार व एअरफोर्स पायलट आकाश करपे यांच्या हस्ते गुणवंतासह पालकांना पेढा भरवुन व पुष्पगुच्छ देवुन सन्मानीत करण्यात आले. राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटकांतील गुणवंतासाठी केंद्र सरकारकडुन परीक्षेचे आयोजन करण्यात येते. सोमेश्वरच्या गुणवंतांना २०२३ मध्ये पाच लाख बावन्न हजार रुपये २०२४ मध्ये नऊ लाख रुपये स्कॉलरशिप मिळाली होती तर २२ फेब्रुवारी २०२४ पासुन परीक्षेपर्यंत घेतलेल्या जादा तासिका, आयोजित केलेले सेमिनार्स आणि झालेल्या दोनशे सराव परीक्षा यामुळे सोमेश्वर शैक्षणिक संकुलातील कन्या-१६ व बॉईज-२७ असे एकुण-४३ गुणवंत परीक्षा उत्तीर्ण झाले आहेत. गुणवत्ता यादीतील धारक व सारथी अशा दोन्ही प्रकारात सोमेश्वर शैक्षणिक संकुलाचे विद्यार्थी किमान चौदा लाख रुपयांच्या शिष्यवृत्तीचे मानकरी ठरणार असल्याने घाटनांदूर परिसरातील शैक्षणिक क्षेत्रात पुन्हा नवा ऐतिहासिक महाविक्रम स्थापित होत आहे. याप्रसंगी बँक व्यवस्थापक शरद देडे व पायलट आकाश करपे यांनी प्रेरणादायी मार्गदर्शन केले तर टॉपर अर्पिता मुंडे, पालक चंद्रकांत नागरगोजे व सौ.मोटेराव यांनी भावुक प्रतिक्रिया व्यक्त केल्या. विशेषण म्हणजे पास प्रमाणात सोमेश्वर शैक्षणिक संकुलाचा जिल्ह्यात दुसरा क्रमांक आला असल्याने शिक्षणप्रेमींना आनंद व्यक्त केला आहे. दर्जेदार शिक्षण, सहशालेय उपक्रम, शैक्षणिक गुणवत्ता आणि स्कॉलरशिपमध्ये नेत्रदिपक, लक्षवेधी व दिमाखदार कामगिरी करण्यासाठी सोमेश्वरसारथी बांधिल आहेत. याप्रसंगी कठोर परिश्रम घेणाऱ्या अभ्यासु मार्गदर्शक शिक्षकांचा सुध्दा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला तर चा पॅटर्न, अभ्यासक्रम, तंत्र-मंत्रासह मायक्रो नियोजन करणारे मुअ श्रीमती एस.के.जाधव मॅडम व पर्यवेक्षक कृष्णा देशमुख सरांचा मान्यवर व पालकांच्या हस्ते शाल-पुष्पगुच्छ देवुन विशेष सत्कार करण्यात आला. या सत्कार सोहळ्यास पालक, शिक्षक, विद्यार्थी व घाटनांदूर परिसरातील शिक्षणप्रेमी नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सत्कार सोहळ्याचे अभ्यासपुर्ण प्रस्ताविक पर्यवेक्षक कृष्णा देशमुख सर तर शैलिदार सुत्रसंचलन व आभार एफ.एफ.शेख सरांनी व्यक्त केले.

# राजमा (घेवडा) खा आणि आरोग्य तंदुरुस्थ ठेवा

दिनकर जाधव । सारणी

राजमा खाण्याचे शौकीन आपल्याला अनेक ठिकाणी मिळतील. राजमा पोषक द्रव्यांनी परिपूर्ण आहे. त्यात सर्वाधिक फायबर आणि प्रथिने असतात. याशिवाय लोह, तांबे, फोलेट, फॉस्फरस, मॅग्नेशियम, कॅल्शियम, व्हिटॅमिन सी, व्हिटॅमिन के यासारखे पौष्टिक पदार्थ आढळतात. एका अभ्यासानुसार १०० ग्रॅम राजमामध्ये सुमारे ३५० कॅलरी आणि २४ ग्रॅम प्रथिने मिळतात.



राजमा खाल्ल्याने आपल्याला भरपूर प्रमाणावर ऊर्जा मिळते. कारण राजमामध्ये भरपूर प्रमाणात लोह आढळून येते. जे शरीरातील चयापचय आणि ऊर्जा वाढवण्यासाठी खूप उपयुक्त आहे. राजमा खाल्ल्याने शरीरातील ऑक्सिजनचा प्रवाह सुरळीत होतो. राजमामध्ये गुड कॅलरीज असतात. जे आपले वजन नियंत्रणात ठेवण्यास मदत करतात. दुपारच्या जेवणाला आपण राजमा सुपचे सेवन करू शकता. यातील पोषक तत्वे शरीराला योग्य कॅलरीज देते. किडनी बीन्समध्ये असलेले फायबर शरीरातील चयापचय व्यवस्थित ठेवते.

राजमा कार्बोहायड्रेट्स कमी करते, ज्यामुळे रक्तातील साखर कमी होते. राजमा शरीरातील कोलेस्टेरॉल कमी करण्यासाठी उपयुक्त आहे. किडनी बीन्समध्ये असलेले फायबर वजन नियंत्रित ठेवते, ज्यामुळे कोलेस्ट्रॉल कमी होते. राजमा खाल्ल्याने मेंदू तल्लख होतो यासह स्मरणशक्तीही वाढते. यामध्ये असलेले व्हिटॅमिन के मेंदूसाठी खूप फायदेशीर आहे. याशिवाय यामध्ये असलेले मॅग्नेशियम देखील मायग्रेनची समस्या दूर करते. आठवड्यातून एकदा राजमा खाल्ल्याने ही समस्या दूर होते. राजमाचे सेवन तुमच्या केस आणि त्वचेसाठी खूप फायदेशीर आहे. यामध्ये व्हिटॅमिन-सी मुबलक प्रमाणात आढळून येते जे केसांची योग्य निगा राखतात. व्हिटॅमिन-सी देखील आपल्या त्वचेसाठी उत्तम आहे, याने त्वचा तजेलदार बनते. विटॅमिन के ची पर्याप्त मात्रा ब्रेनसोबत नर्वस सिस्टिमसाठीदेखील फायदेशीर असते. राजमामध्ये उपलब्ध असलेली थियामिनची मात्रा मेंदूची क्षमता वाढवण्यास मदत करते. यामुळे अल्जायमर सारखा आजार होण्यापासून बचाव होतो. प्रथिने, फायबरने समृद्ध असलेला राजमा रक्तातील साखर नियंत्रणात ठेवण्यास मदत करतो. राजमा खाल्ल्यानंतर राजमा खाल्ल्याने टाइप -२ मधुमेहाचा धोका कमी होतो. किडनी बीन्समध्ये असलेले फायबर शरीरातील चयापचय व्यवस्थित ठेवते. राजमा कार्बोहायड्रेट्स कमी करते, ज्यामुळे रक्तातील साखर कमी होते. राजमा खाल्ल्याने आपल्याला भरपूर प्रमाणावर ऊर्जा मिळते. कारण राजमामध्ये भरपूर प्रमाणात लोह आढळून येते. जे शरीरातील चयापचय आणि ऊर्जा वाढवण्यासाठी खूप उपयुक्त आहे. राजमा खाल्ल्याने शरीरातील ऑक्सिजनचा प्रवाह सुरळीत होतो.

कार्यालय नगरपंचायत घनसावंगी जि जालना

प्रशासकीय इमारत, घनसावंगी जि. जालना

npghansawangi@gmail.com Ph no ०२४८३-२७१७८७

जा.क्रं.२०२५/नपघ/जा.प्र./कावी- २२६ दिनांक:-१०/०२/२०२५

-: जाहीर प्रगटन

सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार दिगंबर लक्ष्मण सोनवणे रा. राहेरा ता.घनसावंगी जि.जालना यांनी नामे बालासाहेब गोपाळराव लोंढे रा. शेवगळ ता. घनसावंगी जि. जालना यांच्याकडुन रजिस्टर दस्त क्रं ३८०१ दि. ०९/१२/२०२५ या खरेदीदस्ताची सत्य प्रत जोडुन आवक क्रं १४७ दिनांक:- १६/०१/२०२५ रोजी नामांतर करण्यासाठी अर्ज सादर केला बालासाहेब गोपाळराव लोंढे रा. शेवगळ ता. घनसावंगी जि.जालना नावावर असलेला गट नं (-) मधील प्लॉट नं. सि.स.नं. ज्याचा मिळकत क्रं १२८६ मधील एकुण क्षेत्र १०१.२० चौ.मी नावे करणेस्तव ज्याची चतु: सिमा खालील प्रमाणे आहे.

पुर्व :-रस्ता

पश्चिम :- ज्ञानेश्वर उढाण यांची जागा

दक्षिण :- नेताजी देशमुख यांची जागा

उत्तरेस :- नेताजी देशमुख यांची जागा

या वरील चतुः सिमा मधील १०१.२० चौ.मी जागा खरेदीदस्ता आधारे नामांतर करणे बाबत कोणाचेही काही उजर/ आक्षेप/तक्रार असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन या कार्यालयात १५ दिवसाच्या आत लेखी कागदपत्राच्या पुराव्या सह आक्षेप अर्ज दाखल करावा. नसता नियमाने मुदत संपल्यावर नामांतर साठी कोणाचेही काहीही म्हणने नाही. असे समजुन नामांतर कार्यवाही पुर्ण करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

करीता जाहीर प्रगटन माझ्या सहीने व कार्यालयाच्या शिक्याने दिले आहे.

**मुख्याधिकारी**
**नगरपंचायत घनसांवगी**

जाहिर प्रगटन

मा. श्री.व्ही.सी. जोशी १ ले दिवाणी न्यायाधीश क. स्तर बीड ता.जि. बीड यांचे न्यायालयात किरकोळ दिवाणी अर्ज नंबर २६२/२०२५ ॲड. तावरे जी.एच. यांच्या मार्फत

वनिता साकेत मिश्रा वि. निरंक

ज्यापेक्षा साकेत पि. दत्तात्रय मिश्रा, हे दिनांक १२.०१.२०२५ रोजी मातोश्री हॉस्पीटल बीड ता.जि.बीड येथे मयत झालेले आहेत आणि तसेच अर्जदार :- १) वनिता भ्र.साकेत मिश्रा, वय ३७ वर्षे, धंदा-घरकाम रा.आनंदनगर धानोरा रोड, बीड ता.जि.बीड. २) ग्यान पि. साकेत मिश्रा, वय-१३ वर्षे, धंदा शिक्षण, अज्ञान अ.पा.क. आई अर्जदार क्र. १ रा.सदर ३) आशालता भ्र.दत्तात्रय मिश्रा, वय ६३ वर्षे धंदा घरकाम, ग. सदर

अर्जदार क १ ही मयत साकेत पि. दत्तात्रय मिश्रा यांनी पत्नी असून अर्जदार कं २ हा मयताचा अज्ञान मुलगा आहे. अर्जदार कं. ३ ही मयतासी आई आहे. अर्जदार कं. २ हा अज्ञान असून त्याची अ.पा.क. आई अर्जदार कं. १ ही आहे. या अर्जदाग व्यतीरिक्त मयतास इतर दुसरे कोणीही वारस नाहीत. असे वरील अर्जदारांचे महणणे आहे. वरील अर्जदार यांनी ते मयताचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र त्यांच्या हक्कात मिळण्यासाठी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

त्यापेक्षा सदरहू अर्जदार मयताचे वारस नवोत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत, त्यानी हया कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट, मदरह अर्जदारांच्या हक्काबददल लागलीच पुरावा घेऊन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास, त्यांना/अर्जदारांना मदरह मयत साकेत पि. दत्तात्रय मिश्रा, यांचे वारस असल्या बाबतने प्रमाणपत्र देईल यासी नोंद घ्यावी

प्रकरणाची पुढील तारीख २१/०३/२०२५ आहे.

आज दिनांक १० फेब्रुवारी २०२५ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्कानिशी दिले.

**क. लिपीक**

**आदेशावरून**
**अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय व स्तर, बीड**

cmyk

राज्य लोकतंत्र शेत-शिवार
मंगळवार दि.११ फेब्रुवारी २०२५
४

# हॉटेलमध्ये जे पनीर मिळतं ते दुधापासून नव्हे

## मंत्री राधाकृष्ण विखे पाटलांचा खळबळजनक दावा

नाशिक येथे स्वामी समर्थ केंद्राच्या माध्यमातून आयोजित करण्यात आलेल्या कृषी महोत्सवाचा आज रविवारी (दि. १०) जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि माजी मंत्री छगन भुजबळ यांच्या उपस्थितीत समारोप करण्यात आला. यावेळी बोलताना राधाकृष्ण विखे पाटील यांनी खळबळजनक दावा केलाय. हॉटेलमध्ये जे पनीर मिळते ते दुधापासून नव्हे तर व्हेजिटेबल ऑईलपासून तयार होते, असे त्यांनी म्हटले आहे. राधाकृष्ण विखे पाटील म्हणाले की, मी कृषी मंत्री असताना पहिला कृषि महोत्सव सुरू झाला. कृषि महोत्सव सुरू करण्याचे भाग्य मला लाभले. शेतकऱ्यांच्या जीवनात नवा आत्मविश्वास निर्माण करण्याचा प्रयत्न अविरतपणे सुरू आहे. सलग १४ वर्षांपासून महोत्सव सुरू आहे. राज्यातील शेतकरी येथे उपस्थित आहेत. बदलते हवामान, ग्लोबल वार्मिंगचा फटका शेतीला बसतो, त्यामुळे शेतकऱ्यांसाठी एक रुपयात पीकविमा आपण देत आहोत. संवेदनशीलपणे काम हे सरकार करत



आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या नेतृत्वाखाली सर्वाधिक गुंतवणूक शेतीत केली जात आहे असे त्यांनी म्हटले.

राधाकृष्ण विखे पाटील पुढे म्हणाले की, पाण्याची समस्या, पाण्याच्या नियोजनाचा प्रश्न, आपले ६० टक्के कालवे गळके आहेत, शेवटपर्यंत पाणी जात नाही. शेतकऱ्यांची मागणी आहे त्यानुसार पाणी द्यावे लागणार आहे. ६५ टीएमसी पाणी पश्चिमेला वाहून जाते ते वळविण्याचे काम करायचे आहे. ५० ते ६० हजार कोटींचे काम आहे. शेतीला पाणी दिले पाहिजे. नाशिक महापालिका पाणी वापरते, किती पाणी वाया जाते? किती पाण्याचा वापर होतो? किती पाणी पुनर्वापर केला जातो? याकडे आता लक्ष दिले जाणार आहे, असेही त्यांनी म्हटले. ५५ टक्के पाणी बिगर सिंचनाला वापरले जाते. याचा अर्थ शहरी भागाला जास्त पाणी जात आहे. शेती क्षेत्रात बदल स्वीकारले पाहिजे. अनेक तरुण पुढे येत आहेत, स्टार्टअप तयार होत आहेत. शेतीतील संशोधन वाढत जात आहे. रासायनिक खतांचा परिणाम नव्या पिढीवर होत आहे. सर्वात जास्त बोगस कीटकनाशके नाशिकमध्ये तयार होत आहे. यामुळे कर्करोगाचा आजार वाढतोय. जैविक खताचा वापर केला पाहिजे, असे राधाकृष्ण विखे पाटील म्हणाले.

पुढील दीड वर्षात दूध उत्पादनाचे सर्वात मोठे आव्हान असणार आहे. अमूलचा समूह राज्यातून ३५ ते ४० लाख लिटर दूध खरेदी करतो. लोक म्हणतात गुजरातचे दूध बंद करा. मात्र, अमूलचा समुह आपल्याकडून दूध विकत घेतो म्हणून दूध संकलन टिकून आहे. आता दुधापासून पनीर तयार होत नाही. हॉटेलमध्ये जे पनीर मिळते ते दुधापासून नव्हे तर व्हेजिटेबल ऑईलपासून तयार होते. दूधपासून बनलेले पनीर खरेदी करा, असे त्यांनी म्हटले. आपल्याकडे कांद्याचा भाव कमी झाला की रास्तारोको, उसाला कमी भाव मिळाला की रास्तारोको करतात, मात्र इतर विषयाकडे लक्ष घालते पाहिजे. कांदा उत्पादकांना हमीभाव दिला पाहिजे. व्यापाऱ्यांकडील लूट थांबणार आहे. सर्वाधिक कष्ट करणारा शेतकरी वर्ग आहे. जिथे इच्छाशक्ती आहे तिथे काम करुन दाखविले पाहिजे. शेतकरी समृद्ध झाला पाहिजे, यासाठी तंत्रज्ञानाचा वापर केला पाहिजे, असे राधाकृष्ण विखे पाटील यांनी म्हटले आहे.

# भेंडी लागवडीसाठी जातींची निवड महत्वाची

भेंडीच्या ज्या सुधारित जाती आहेत त्या पुसा सावनी, परभणी क्रांती, अर्का अनामिका, पंजाब पद्मिनी आणि अर्का अभय या जाती आहेत. या सर्व जाती कमी वेळात चांगले उत्पादन देण्यास सक्षम आहेत. या जातींची मागणी वर्षभर बाजारात असते. भेंडीच्या या जातींची लागवड देशातील अनेक राज्यांमध्ये केली जाते.

भेंडीच्या या ५ सुधारित जातींमध्ये जीवनसत्त्वे, फायबर, अँटिऑक्सिडंट्स आणि खनिजे तसेच कॅल्शियम, पोटॅशियम, मॅग्नेशियम, फॉस्फरस आणि लोह मुबलक प्रमाणात असते. यामुळे या भेंडीच्या जातींबद्दल आज आम्ही तुम्हाला माहिती देणार आहोत.

१) पुसा सावनी – भेंडीची ही सुधारित जात उन्हाळा, थंडी आणि पावसाळ्यात सहज पिकवता येते. पुसा सावनी जातीची भेंडी पावसाळ्यात सुमारे ६० ते ६५ दिवसांत तयार होते.

२) परभणी क्रांती – भेंडीची ही जात पिटा रोगास प्रतिरोधक मानली जाते. जर शेतकऱ्यांनी बियाणे शेतीत लावले तर त्यांना सुमारे ५० दिवसांत फळे येऊ लागतात. परभणी क्रांती जातीचा रंग गडद हिरवा असतो आणि तिची लांबी १५-१८ सेमी असते. ३) अर्का अनामिका वाण- ही जात यलो मोझॅक विषाणू रोगाशी लढण्यास सक्षम आहे. या जातीच्या भेंडीमध्ये केस आढळत नाहीत आणि त्याची फळे अतिशय मऊ असतात. ही जात उन्हाळा आणि पावसाळ्यात चांगले उत्पादन देण्यास सक्षम आहे.

४) पंजाब पद्मिनी – भेंडीची ही जात पंजाब विद्यापीठाने विकसित केली आहे. या प्रकारची भेंडी सरळ आणि गुळगुळीत असते. त्याच वेळी जर आपण त्याच्या रंगाबद्दल बोललो तर ही भेंडी गडद रंगाची आहे.

५) अर्का अभय – ही जात पिवळ्या मोझॅक विषाणू रोगाशी लढण्यास सक्षम आहे. अर्का अभय जातीची भेंडी शेतात लागवड केल्यावर काही दिवसात चांगले उत्पादन देते. या जातीची भेंडीची झाडे १२०-१५० सेमी उंच आणि सरळ असतात.



# आंब्यावरील मोहोराचे संरक्षण कसे करावे?

आंब्याच्या कलमांना सर्वसाधारणपणे ४ थ्या ते ५ व्या वर्षी आंबे लागतात. परंतु काही झाडांना दुसऱ्या वर्षीच मोहोर येतो. दुसऱ्या वर्षी आलेला मोहोर काढून टाकायचा असतो. फलधारणेसाठी त्यास वाढू द्यायचे नसते. आंब्याचे व्यापारीदृष्ट्या उत्पादन ८ व्या वर्षी चालू होते. काही झाडांवरील फळेसुद्धा विक्रीस नेतात. काही झाडांना मोहोर भरपूर येतो परंतु त्यापासून फळधारणा कमी होते. पुंकेसर असलेली फुले जर मोहोरलेल्या झाडात अधिक असतील तर ती साहजिकच गळून पडतील. तसेच मर्यादित किड्यांच्या हालचालीमुळे परागीकरण कमी प्रमाणात झाल्यास फळधारणा कमी प्रमाणात होते. तिसरे कारण म्हणजे भुरी व तुडतुड्यांपासून मोहराचे संरक्षण योग्य प्रमाणात होणे हे होय. आंब्याच्या फलोत्पादनात पीक संरक्षणास अनन्यसाधारण महत्त्व आहे. आंब्याच्या मोहरावर पडणाऱ्या किडी व रोगाचा आंबा उत्पादनावर फार मोठा परिणाम होतो. आंब्याच्या मोहरावर मुख्यत्वेकरून तुडतुडे, शेंडा पोखरणारी अळी, भुरी तसेच मिज माशीमुळे फार मोठा परिणाम होतो.

तुडतुडे उपाययोजना : ०.५ टक्के कार्बारिल किंवा फोस्फोमिडॉन ०.५ % किंवा ०.०५ % क्विनोलफॉस या कीटकनाशकांच्या फवारण्या ५ दिवसांच्या अंतराने आलटून-पालटून कराव्यात. पहिली फवारणी झाडावर मोहोर फुटू



लागण्यापूर्वी करावी.शेंडा पोखरणारी अळी उपाययोजना : ०.०१ % कार्बारिल किंवा ०.५ % डायमिथोएट फवारणी झाडावर करावी.

मिज माशी, उपाययोजना : ०.०५ % फोस्फोमिडॉन, ०.५ % डायमिथोएटची फवारणी करावी.मोहोरावरील भुरी रोग, उपाययोजना : या रोगाच्या नियंत्रणासाठी कीटकनाशकाच्या द्रावनामध्ये पाण्यात मिसळणारे गंधक २ ग्रॅम या प्रमाणात मिसळून फवारणी करावी. आंब्यावरील तुडतुडे, शेंडा पोखरणारी अळी आणि भुरी रोग नेहमी आंब्याच्या मोहरावर मोठ्या प्रमाणात आढळून येतात. आंबाच्या मोहोराचे संरक्षण करताना या किडींवर नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. तुडतुडे आंब्यावर नेहमीच आढळून येतात. मोहोर येण्यापूर्वी झाडावर कीटकनाशके, बुरशीनाशके मारणे अत्यावश्यक आहे. कारण झाडाच्या मोहोरावरील कीटकावर नियंत्रण ठेवणे अतिशय कठीण जाते.

मोहोरावरील पीक संरक्षणाची योग्य ती अंमलबजावणी केली तर तुडतुडे, खोडकिडा व मिज माशी या किडीवर नियंत्रण ठेवून त्यांचा प्रतिबंध करता येतो. आंब्याला मोहोर येण्यापूर्वी खोड, फांद्या आणि पाने यावर औषधाची फवारणी करावी. राहिलेल्या चार फवारण्या पंधरा दिवसांच्या अंतराने कराव्यात. शक्यतो दर फवारणीच्या वेळेस वेगवेगळी कीटकनाशके वापरावी. कीटकनाशकाच्या बरोबर पाण्यात मिसळणारे गंधक अथवा कार्बेन्डाझिम दुसऱ्या व चौथ्या फवारणीच्या वेळी मिसळून फवारावे. कीटकनाशकाच्या निवडीबरोबर त्याची मात्रा व वेळेवर फवारणी या बाबीसुद्धा तितक्याच महत्वाच्या आहेत.

# जनावरांमधील लाळ्या खूरकूत आजार

जनावरांमध्ये वेगवेगळ्या प्रकारचे आजार होतात. वेळोवेळी जनावरांच्या आजाराची लक्षणे व्यवस्थित ओळखून उपचार केले तर संभाव्य नुकसान होऊ शकते. लाळ्या खुरकूत आजार खुरे असलेल्या जनावरांमध्ये दिसतो. हा संसर्गजन्य आजार आहे.

जनावरांना १०२ ते १०४ अंश फॅरानहाइट किंवा यापेक्षा जास्त ताप येतो. जनावरांची जीभ, हिरड्या, गालाच्या आतील भाग, दोन खुरांमध्ये पाणी भरल्यासारखे फोडे येतात. हे फोड फुटून त्या जागेवर भाजल्यासारखे लाल चट्टे दिसतात. त्याची भयंकर आग होते. खुरांमधील जखमांवर माश्या बसल्यास अळ्या पडून जखम चिघळते. अशा वेळेस खूर गळून पडू शकतात. आजारी जनावरांचे दूध उत्पादन कमी होते. जनावर खाणे पिणे बंद करतात. हा आजार पाच ते सात दिवसांत बरा होतो. परंतु आजारात खूप ताप येत असल्याने जनावरांची प्रतिकार शक्ती कमी होते. त्यामुळे दुसऱ्या आजाराच्या जिवाणूंचा प्रादुर्भाव होऊन दुसरा एखादा आजार होऊ शकतो. आजारामुळे दुधाळ जनावरांची दूध उत्पादकता वीस टक्क्यांनी कमी होते. जनावरांची काम करण्याची क्षमता ५० टक्क्यांनी कमी होते. दुधाळ, विदेशी तसेच संकरित जनावरांमध्ये आजाराची तीव्रता जास्त आढळते.

आजारी जनावरांची लाळ, मल-मूत्र, दुधातून तसेच फोडामधील द्रवपदार्थांमधून सहज पसरतो. जेव्हा हवेत आर्द्रता जास्त असते तेव्हा एका जागेतून दुसरीकडे हा आजार सहज पसरू शकतो. निरोगी आणि आजारी जनावरांना एकत्रित खाणे आणि पिण्याची सोय केल्यावर आजाराचा प्रसार वाढतो. नवीन विकत घेतलेल्या जनावरांचे वैद्यकीय परीक्षण पूर्ण होईपर्यंत फार्म, शेतामध्ये इतर जनावरांपासून त्यांना वेगळे ठेवावे. प्रभावित क्षेत्रामधून जनावर खरेदी करू नये. उपचार : तोंडामधील जखमा तुरटीच्या पाण्याने (५ ग्रॅम तुरटी+ १ लिटर पाणी) किंवा जंतुनाशकाने धुवाव्यात. जखमांवर हळद, ग्लिसरीन, बोरिक ॲसिड पावडर यांचे मिश्रण लावावे. पायांमधील जखमा पोटॅशिअम परमॅग्नेटच्या द्रावणाने (१ ग्रॅम पोटॅशिअम परमॅग्नेट, ३ लिटर पाणी) धुवाव्यात.सहा महिन्यांतून एकदा मॉन्सूनपूर्व एफएमडी संवेदनक्षम जनावरांचे लसीकरण करावे. वासरांना प्रथम लसीकरण वयाची ४ महिने झाल्यावर आणि दुसरे लसीकरण २१ दिवसांनंतर लगेच करावे. त्यानंतर बूस्टर डोस ६ महिन्यातून एकदा द्यावा.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

६६० : सम्राट जिम्मु यांनी जपानचे राष्ट्र निर्माण केले.
१६६० : औरंगजेबाने मुख्तारखान याला दख्खनेची जबाबदारी देऊन औरंगाबाद येथे पाठवले.
१७५२ : पेनसिल्व्हानिया हॉस्पिटल या अमेरिकेतील पहिल्या हॉस्पिटलचे बेंजामिन फ्रँकलिनच्या हस्ते उद्घाटन झाले.
१८२६ : लंडन विद्यापीठाची स्थापना.
१८१८ : इंग्रजांनी अजिंक्यतारा किल्ला ताब्यात घेतला.
१८३० : मुंबईचे हंगामी राज्यपाल सर सिडने ब्रेकनिथ यांच्या अध्यक्षतेखाली सभा होऊन ॲग्री हॉर्टिकल्चरल सोसायटी ऑफ इंडिया या संस्थेची स्थापना झाली.
१९११ : हेन्री पिके याने हंटर जातीच्या विमानातून भारतातील पहिली 'एअर मेल' अलाहाबादवरुन नैनी या १० किलोमीटर अंतरावरील गावाला वाहून नेली.
१९२९ : पोप पायस (११ वा) आणि बेनिटो मुसोलिनी यांच्यात झलेल्या 'लॅटेरान ट्रिटी' या विशेष करारानुसार 'व्हॅटिकन सिटी' हे शहर राष्ट्र इटालीतुन वेगळे करण्यात आले. कॅथॉलिक ख्रिश्चनांचे हे प्रमुख धर्मपीठ आहे.
१९३३ : आजच्या दिवशी महात्मा गांधी यांनी हरिजन या साप्ताहिकाची सुरुवात केली.
१९७९ : पंतप्रधान मोरारजी देसाई यांनी अंदमान निकोबार बेटावरील सेल्युलर जेल राष्ट्रीय स्मारक म्हणून घोषित केले.
१९९० : २७ वर्षांच्या तुरुंगवासानंतर नेल्सन मंडेला यांची तुरूंगातुन सुटका
१९९७ : खगोलशास्त्री ''जयंत वी नार्लीकर'' यांना १९९६ चा युनेस्को कलिंग पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.
१९९९ : मध्यप्रदेश सरकारतर्फे दिला जाणारा लता मंगेशकर पुरस्कार प्रसिद्ध संगीतकार इलियाराजा यांना जाहीर.
२०११ : १८ दिवसांच्या जनआंदोलनानंतर होस्नी मुबारक यांना इजिप्तची सत्ता सोडणे भाग पडले.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१७५० : आजच्या दिवशी आदिवासी लीडर तिलका मांझी यांचा जन्म.
१८०० : हेन्री फॉक्स टॅलबॉट – छायाचित्रणकलेचा पाया घालणारे (मृत्यू: १७ सप्टेंबर १८७७)
१८३९ : अल्मोन स्ट्राउजर – अमेरिकन संशोधक टेलिफोन एक्सचेंज (मृत्यू: २६ मे १९०२)
१८४७ : थॉमस अल्वा एडिसन – अमेरिकन संशोधक आणि उद्योजक (मृत्यू: १८ आक्टोबर १९३१)
१९३७ : बिल लॉरी – ऑस्ट्रेलियन क्रिकेटर
१९४२ : गौरी देशपांडे – कादंबरीकार, लघुकथालेखिका आणि कवयित्री (मृत्यू: १ मार्च २००३)
१९५६ : भारतीय माजी क्रिकेटर सोभा पंडित यांचा जन्म.
१९५७ : प्रसिद्ध अभिनेत्री टीना अंबानी यांचा जन्म.
१९६१ : भारतीय चित्रपट अभिनेता रजत कपूर यांचा जन्म.
१९६७ : पद्मश्री पुरस्काराने सन्मानित प्रसिद्ध भारतीय गायिका मालिनी अवस्थी यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१६५० : रेने देकार्त – फ्रेन्च तत्त्वज्ञ व गणितज्ञ (जन्म: ३१ मार्च १५९६)
१९४२ : जमनालाल बजाज – प्रसिद्ध गांधीवादी कार्यकर्ते, स्वातंत्र्यसैनिक आणि बजाज उद्योगसमुहाचे प्रणेते (जन्म: ४ नोव्हेंबर १८८४)
१९६८ : पण्डित दीनदयाळ उपाध्याय – तत्त्वज्ञ, अर्थतज्ञ, समाजशास्त्री, इतिहासकार, पत्रकार, राजकीय नेते आणि जनसंघाचे एक संस्थापक यांची अज्ञात मारेकर्याकडुन हत्या (जन्म: २५ सप्टेंबर १९१६)
१९७७ : फक्रुद्दीन अली अहमद – भारताचे ५ वे राष्ट्रपती. १९७४ च्या राष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीत इंदिरा गांधींच्या नेतृत्त्वाखालील काँग्रेसतर्फे ते निवडून आले. २५ जून १९७५ रोजी आणीबाणीची घोषणा त्यांच्याच कारकिर्दीत करण्यात आली. (जन्म: १३ मे १९०५)
१९८६ : तत्त्वज्ञ, अर्थतज्ञ, समाजशास्त्री, इतिहासकार, पत्रकार, राजकीय नेते पण्डित दीनदयाळ उपाध्याय यांची अज्ञात मारेकर्याकडुन हत्या. (जन्म: २५ सप्टेंबर १९१६)
१९८९ : ला प्रसिद्ध लेखक पंडित नरेंद्र शर्मा यांचे निधन.
१९९३ : सईद अमीर हैदर कमाल नक्वी ऊर्फ 'कमाल अमरोही' चित्रपट निर्माता, दिग्दर्शक, संवादलेखक, पटकथाकार व कवी (जन्म: १७ जानेवारी १९१८)
२००७: भारतीय चित्रपट अभिनेता युनुस परवेझ यांचे निधन.

# उसामध्ये हे आंतरपीक देते चांगला फायदा

ऊस हे दीर्घ कालावधीचे पीक असल्याने. त्याचे पीक तयार होण्यासाठी सुमारे १० ते १२ महिने लागतात. अशा परिस्थितीत शेतकरी या मध्यंतरीच्या वेळेचा फायदा घेऊन या काळात उसाबरोबरच अशी अनेक पिके घेऊन जादा कमाई करू शकतात. त्यामुळे उसासह इतर पिकांच्या उत्पादनाचा लाभ शेतकऱ्यांना मिळतो. ऊस उत्पादक शेतकरी केवळ एकाच पिकावर अवलंबून असेल तर त्यातून त्यांना हवा तसा नफा मिळू शकत नाही. अशा परिस्थितीत त्यांना उत्पन्न वाढविण्याकडे लक्ष द्यावे लागेल. उसासोबत अशी अनेक पिके आहेत जी उसापूर्वी पक्क झाल्यावर तयार होतात. या पिकांमधून फायदेशीर पिके निवडून शेतकरी उसाचे पीक तयार होण्यापूर्वी या पिकाची विक्री करून नफा कमवू शकतो.

उसासोबत कोणती पिके घेता येतात?

ज्या शेतकऱ्यांनी फेब्रुवारी-मार्चमध्ये उसाची लागवड केली आहे ते उसासोबत मूग, उडीद, धणे, मेथीची लागवड करू शकतात. हे पीक लाव्रात लवकर विक्रीसाठी येते आणि याला बाजार देखील चांगला असतो त्यामुळे शेतकऱ्यांना याचा मोठ्या प्रमाणात फायदा होतो.

असे करा नियोजन : जर तुम्हाला उसासोबत मूग वाढवायचा असेल तर त्याचे गुणोत्तर १:१ आहे, म्हणजे उसाची एक ओळ आणि मूग दुसऱ्या ओळीत लावा. जर तुम्हाला उसासोबत उडीद पिकवायचे असेल तर १:१ हे प्रमाण ठेवा. तुम्हाला उसासोबत कोथिंबीरची लागवड करायची असेल, तर ऊस आणि कोथिंबीरचे गुणोत्तर १:३ ठेवा. त्याचप्रमाणे, जर तुम्हाला उसासोबत मेथीची लागवड करायची असेल, तर त्याचे प्रमाण १:३ ठेवा. मुग आणि उडदाला मिळतो चांगला भाव : कडधान्य पिकांपैकी मूग आणि उडीद या पिकांना बाजारात मागणी जास्त असून त्याचे भावही चांगले आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांनी उसासोबत मूग आणि उडदाची लागवड करणे अत्यंत फायदेशीर ठरू शकते. मध्य प्रदेशातील अनेक शेतकरी शेत रिकामे असताना मूग पिकवून अतिरिक्त कमाई करत आहेत. विशेष म्हणजे मध्यप्रदेशात राज्य सरकार स्वतः दरवर्षी किमान आधारभूत किमतीत शेतकऱ्यांकडून मूग खरेदी करते. अशा परिस्थितीत तेथील शेतकऱ्यांना मूग लागवडीतून अतिरिक्त उत्पन्न मिळत आहे.

उसासह मूग आणि उडीद लागवडीचा फायदा : उसासोबत मूग आणि उडीदाची लागवड केल्यास जमिनीची सुपीकता वाढते. त्याचबरोबर खतांवर होणारा खर्चही कमी होईल. तुम्ही कडधान्य पिकाला दिलेल्या खताचा फायदा ऊस पिकालाही मिळेल. त्याच वेळी, आपल्याला या पिकांच्या सिंचनासाठी अतिरिक्त व्यवस्था करावी लागणार नाही. तुमच्या उसाच्या पिकाबरोबरच या पिकांनाही आपोआप पाणी दिले जाईल. अशाप्रकारे ऊस पिकासह मूग आणि उडीद पिकाची लागवड करून कमी खर्चात जास्त नफा मिळवता येतो. दुसरीकडे, ऊस पिकाला मूग आणि उडीद लागवडीतून नायट्रोजन मिळते, जे त्याच्या चांगल्या उत्पादनासाठी फायदेशीर आहे.



# सोयाबीन हमीभाव खरेदी केंद्रांना महिनाभर मुदतवाढ द्यावी

## सरकारच्या शेतकरी विरोधी धोरणाच्या निषेधार्थ जिल्हाधिकारी कार्यालयात सोयाबीन उधळत लक्ष्यवेधी आंदोलन







बीड। प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील सोयाबीन हमीभाव खरेदी केंद्रें बंद झाल्याने २३ हजार शेतकऱ्यांचे सोयाबीन खरेदीविना घरात पडुन असुन शेतकऱ्यांना खुल्या बाजारात सोयाबीन विकावे लागुन प्रति क्विंटल १००० रूपये आर्थिक नुकसान टाळण्यासाठी हमीभाव खरेदी केंद्रांना महिनाभर मुदतवाढ देण्यात यावी या प्रमुख मागणीसाठी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली आज दि.१० सोमवार रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर सोयाबीन हमीभाव खरेदी केंद्रांना मुदतवाढ द्यावी घोषणाबाजी करत सोयाबीन उधळुन सरकारच्या शेतकरी विरोधी धोरणाबद्दल तिव्र संताप व्यक्त केला.यावेळी आंदोलनात शेख युनुस, रामनाथ खोड, सुदाम तांदळे, शिवशर्मा शेलार,पांडुरंग हराळे, बप्पासाहेब पवार, बीड जिल्हाध्यक्ष इंटक रामधन जमाले, बीड जिल्हा सचिव इंटक सखाराम बेंगडे आदी सहभागी होते. निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांच्या मार्फत मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, पणनमंत्री जयकुमार गोरे, विभागीय आयुक्त छत्रपती संभाजीनगर यांना निवेदन देण्यात आले.

बीड जिल्ह्यातील सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांपैकी ४४ हजार ७४४ शेतकऱ्यांनी नाफेडकडे सोयाबीन खरेदीसाठी १ आक्टोबर ते १५ सप्टेंबर पर्यंत ऑनलाईन अर्ज केले होते.त्यानंतर १५ आक्टोबर २०२४ पासुन नाफेडच्या वतीने जिल्ह्यातील ३० केंद्रावर ६ फेब्रुवारी २०२५ पर्यंत जिल्ह्यातील २० हजार ९६९ शेतकऱ्यांची ५ लाख ९४ हजार २०१ क्विंटल सोयाबीन खरेदी करून केंद्र बंद करण्यात आले.मात्र नोंदणी केलेले २३ हजार ७७५ शेतकरी वंचित राहिले असल्याने आजही त्यांच्या घरात सोयाबीन पडुन आहे. शासनाने हमीभाव खरेदी केंद्रे बंद केल्याने आता शेतकऱ्यांना हे सोयाबीन खुल्या बाजारात बेभावाने विकावे लागणार आहे. शासनाने यावर्षी सोयाबीनला ४८९२ रुपये हमीभाव दिला होता. खर्च आणि उत्पन्नाचे गणित जुळवताना हा भाव शेतकऱ्यांना परवडणारा नाही.मात्र पर्याय नसल्याने शेतकरी शासनाच्या खरेदी केंद्रावर सोयाबीन विक्री करत होते.आता हे खरेदी केंद्रेही बंद केल्याने शेतकऱ्यांना खुल्या बाजारात ३८०० ते ४००० रूपये प्रति क्विंटल दराने बेभाव विक्री करावी लागत आहे. वास्तविक पाहता आधारभूत धान्य खरेदी किंमतीपेक्षा कमी दराने सोयाबीन अथवा ईतर कोणताही शेतीमाल खरेदी करणं कायद्याने गुन्हा आहे.परंतु याची पडताळणी करणारी यंत्रणाच नसल्याने शेतकऱ्यांची बिनबोभाट लुट सुरू आहे. त्यामुळे शासनाने हमीभाव खरेदी केंद्रांना महिनाभर मुदतवाढ द्यावी अशी मागणी करण्यात आली आहे. अर्थमंत्री निर्मला सितारामन म्हणतात ''विकासाचे पहिले इंजिन कृषी क्षेत्र आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणतात''कृषी क्षेत्रासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करा.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस नेहमीप्रमाणे म्हणतात ''महाराष्ट्राचा दुष्काळ संपवणार'' कृषी मंत्री शेतकऱ्यांना ड्रोनचा शेतीमध्ये वापर करण्याचा सल्ला देतात मात्र दुसरीकडे शेतकरी विरोधी धोरणे राबवतात. एकंदरीत सरकारचा हा दुटप्पीपणा असुन यांचे दाखवायचे दात वेगळे आणि खायचे दात वेगळे आहेत.याबद्दल शेतकऱ्यांमध्ये तिव्र नाराजी आहे.

## मेहनत केली तर उद्याचे भविष्य उज्वल आहे-अमन सिरसट

### महाराणी ताराबाई विद्यालयात इयत्ता १० वी व १२ वीच्या विद्यार्थ्यांना निरोप



वडवणी । प्रतिनिधी

महाराणी ताराबाई विद्यालयातील इयत्ता १० वी व १२ वी विद्यार्थ्यांच्या निरोप समारंभ कार्यक्रमांमध्ये विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना एपीआय अमन सिरसट म्हणाले की,विद्यार्थी मित्रांनो आज मेहनत केली तर उद्याचे तुमचे भविष्य उज्वल आहे म्हणून आज अभ्यास करा.आयीस्ता चल जिंदगी अबी कही कर्ज चुका ना बाकी है कुछ दर्द मिटाने बाकी हैकुछ फर्ज निभाना बाकी है या कवितेच्या ओळीचा अर्थ आपण लक्षात घेतला तर माझ्या भाषणाचा सार्थक झालं असे समजेल तसेच बीड पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी क्यूआर कोड बीड जिल्ह्यातील सर्व पोलीस स्टेशनमध्ये लावलेले आहेत त्याबद्दल माहिती देऊन विद्यार्थ्यांना बोर्ड परीक्षेसाठी शुभेच्छा दिल्या.

याबाबत अधिक माहिती अशी की, वडवणी येथील महाराणी ताराबाई माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील इयत्ता-१० वी व १२ वीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ शनिवार दि.८ फेब्रुवारी २०२५ रोजी विद्यालयांमध्ये संपन्न झाला.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे प्राचार्य राऊत डी.डी.तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून वडवणी पोलीस स्टेशनचे कर्तव्यदक्ष पोलीस अधिकारी एपीआय अमन सिरसट तर प्रमुख अतिथी म्हणून बलभीम महाविद्यालय बीड येथील उपप्राचार्य बिराजदार सर,प्रा.तुपे सर,कवडगाव येथील जय जवान विद्यालयाचे प्राचार्य सारोक्ते डी.जी. सर,वडवणी पोलीस स्टेशन येथील राऊत सर तसेच मुंजाळ सर,उपप्राचार्य मस्के सर,पर्यवेक्षक धाईतिडक सर,श्री.डोईफोडे सर,श्री.ठोंबरे सर,श्री.कुलकर्णी सर,श्री.चोले सर आदींजन मान्यवर म्हणून उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करू कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. विद्यालयातील विद्यार्थी चि.समाधान मुंडे,कु.राधिका निरडे,कु.प्रिती तुरुकझाडे यांनी आपल्या मनोगतातून शाळेतील आठवणींना उजाळा दिला तसेच मान्यवरांनी व अध्यक्ष प्राचार्य राऊत सर यांनी परीक्षार्थी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून त्यांना परीक्षेसाठी शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमासाठी मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विद्यालयातील सर्व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

## फ्लाईंग बर्ड्स अकॅडमीने शैक्षणिक गुणवत्तेबरोबरच सांस्कृतिक वारसा जपला – प्रा.विजय पवार



माजलगाव। प्रतिनिधी

ग्रामीण भागात इंग्रजी माध्यमातून शिक्षणाची दारे खुली करून विद्यार्थी हा शैक्षणिकदृष्ट्या सर्व पैलुतून यशस्वीरीत्या घडला पाहिजे हा दृष्टीकोन ठेऊन फ्लाइंग बर्डस ऍकॅडमीने अल्पावधीतच शैक्षणिक गुणवत्ता राखत स्नेह संमेलना सारख्या विविध कार्यक्रमाच्या माध्यमातून सांस्कृतिक वारसा ही जपला असून इयत्ता पाचवी पासूनच स्पर्धा परीक्षांची तयारी करता यावी म्हणून फाऊंडेशनचे क्लास सुरू करणारी या परिसरातील ही एकमेव संस्था असेल असे मत महाराष्ट्र इंग्लिश स्कूल ट्रस्टीज असोशियन (मेस्टा) चे अध्यक्ष प्रा.विजय पवार यांनी व्यक्त केले आहे ते संस्थेच्या वार्षिक स्नेह संमेलनात प्रमुख अतिथी म्हणून बोलत होते.


कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष पांडुरंग चांडक होते यावेळी व्यासपीठावर प्राचार्या सारिका बजाज,ऐश्वर्या चांडक,संचालक अण्णासाहेब तौर, प्रभाकर शेटे मेस्टाचे बीड, जिल्हा पदाधिकारी उपस्थित होते.याच कार्यक्रमात माजलगावची सूकन्या प्रसिद्ध नृत्यकलाकार वैभवी टाकणखार हीचे दिमाखदार स्वागत करून संस्थेच्या वतीने यथोचित सत्कार करण्यात आला. दिनांक ०८ फेब्रुवारी रोजी माजलगाव येथील फलाईंग बर्ड्स ऍकॅडमी या शाळेचे 'कार्निवल २०२४ -२५' विद्यार्थी स्नेह संमेलन येथील केशवराज मंगल कार्यालय येथे अत्यंत उत्साहात व पालक व प्रेक्षकांच्या प्रचंड गर्दीत संपन्न झाले यात नर्सरी ते आठवी पर्यंतच्या चिमुकल्या विद्यार्थ्यांसह शाळेतील सहाशे विद्यार्थ्यांनी विविध प्रकारचे बत्तीस नृत्य आविष्कार सादर करत आपल्यातील कलागुणांना वाव दिला,पालक वर्गासह उपस्थित जवळपास दोन ते तीन हजार प्रेक्षकानी चार तास चाललेल्या या रंगारंग कार्यक्रमास प्रचंड अशी दाद दिली. स्नेह संमेलन यशस्वी करण्यासाठी उपप्राचार्य सचिन गायकवाड, उपप्राचार्य ज्योती बनसोडे, नृत्यदिग्दर्शक कृष्णा गायकवाड,रमेश बाहेतीसह शिक्षक व कर्मचारी यांनी विशेष परिश्रम घेतले. फ्लाईंग बर्डस ऍकॅडमीचे विद्यार्थी स्नेह संमेलन हे केवळ मनोरंजनाचा भाग कधीच नसते तर अशा रंगीत व संगीतमय कार्यक्रमातून विविध प्रादेशिक नृत्य, सामाजिक व धार्मिक संकल्पनेवर आधारित नृत्य तसेच देशप्रेम व देशभक्तीपर गीतांची रेलचेल असते त्यामुळे एक प्रकारे बालमनावर सामाजिक सलोखा व राष्ट्रीय एकात्मतेची भावना दृढ करण्याचे प्रयत्न अशा कार्यक्रमाच्या माध्यमातून या शाळेकडून केले जात आहेत.

## सरस्वती विद्यामंदिरात रंगभरण चित्रकला, निबंध लेखन व सामान्य ज्ञान स्पर्धा

बीड। प्रतिनिधी

प्रती वर्षाप्रमाणे याही वर्षी सरस्वती विद्यामंदिर शिवाजीनगर बीड प्रशालेत संस्थेचे संस्थापक सचिव मा.श्री.उत्तमराव पवार यांचे वडील स्व.वामन ( दादा) पवार यांचे स्मरणार्थ जिल्हास्तरीय आंतरशालेय रंगभरण चित्रकला स्पर्धा ( गट - १ते४), निबंध लेखन स्पर्धा (गट ५ते ७) व सामान्य ज्ञान स्पर्धा ( गट - ८ ते १०) अशा विविध जिल्हास्तरीय स्पर्धांचे आयोजन सरस्वती विद्यामंदिर शिवाजीनगर बीड प्रशालेत गुरुवार दिनांक-१३/२/२०२५ रोजी सकाळी ठिक ९ ते १० या वेळेत करण्यात आले असून सदरील स्पर्धांचे पत्रके सर्व प्रशालेंना पाठविण्यात आली असून स्पर्धेचे स्वरूप व बक्षीसांची रक्कम सदरील प्रपत्रात नमुद करण्यात आली आहे.

तरी सदरील स्पर्धेत जास्तीत-जास्त प्रशालांनी आपले सहभाग नोंदवून सहकार्य करावे असे स्पर्धा आयोजकांकडून प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकाद्वारे जाहीर आवाहन करण्यात आले आहे.



माजलगाव : तालुक्यातील आडोळा येथे सुरू असलेल्या अखंड हरिनाम सप्ताहात प्रा.सुनिलकुमार रामराव सोळंके गंगामसलेकर यांचे राष्ट्रमाता राजमाता माँ जिजाऊ आणि संस्कार, या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. याप्रसंगी त्यांचा सत्कार करताना आयोजक रामराव जाधव, पत्रकार ज्योतीराम पांढरपोटे व आडोळा येथील ग्रामस्थांची उपस्थिती होती.

## वाळूमाफियाचा मंडळाधिकारी शिंदेवर हल्ला

जालना। प्रतिनिधी

विविध नद्यांच्या पात्रातुन होणारा वाळु उपसा थांबविण्यासाठी प्रशासनाचे प्रयत्न सुरु असतांनाच वाळू माफियाने हल्ल करणे सुरू केले आहे. दैठणा बुद्रूक (ता. घनसावंगी) शिवारात कारवाईसाठी गेलेल्या महसुल पथकावर वाळुमाफियांनी हल्ला केला असून, दगडफेकीत मंडळ अधिकारी पी .डी. शिंदे हा गंभीर जखमी झाले आहेत. याप्रकरणी मंडळ अधिकारी शिंदे हे कारवाई करताना एकाला सोडायचं व दुसऱ्यावर कारवाई करायची अशा कारवाई मंडळ अधिकारी शिंदे करीत होते असे बोलल्या जात आहे. यामुळे कारवाई करणारे मंडळ अधिकारी यांच्यावर हल्ला केल्याचे समजते. तसेच मंडळाधिकारी शिंदे नियमाप्रमाणे कारवाई करीत नसल्याचे बोलल्या जात आहे. या प्रकारामुळे महसुल पथकातील कर्मचाऱ्यांचे खच्चीकरण होत असल्याचे दिसुन येत आहे.

यासंदर्भात अधिक माहिती अशी की, जिल्ह्यातील वेगवेगळ्या भागातून पुर्णा, दुधना, गोदावरी नद्या वाहत असून, वाळु उपसा करण्यावर जिल्हा प्रशासनाने निर्बंध लादलेले आहेत. मात्र, वाळुमाफिया कुणाचेही ऐकण्यास अनेक ठिकाणी वाळु उपसा सुरुच आहे. त्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी ठिकठिकाणी तहसिल हद्दीत महसुल पथकांची नेमणुक करण्यात आलेली आहे. घनसावंगी तहसिलचे पथक रात्री गस्तीवर असतांना दैठणा ब्रद्रुक शिवारातुन अवैध वाळु उपसा आणि वाहतुक होत असल्याची माहिती मिळाली होती. त्यानुसार पथक नियोजीत ठिकाणी पोहोचले असता एका हायवामधुन (एमएच ०५ एएम ५५०३) वाळुची वाहतुक होतांना आढळून आले. त्यानुसार पथकाने थांबवुन रॉयल्टीबाबत विचारणा केली असता चालकाने समाधानकारक उत्तर दिले नाही. त्यामुळे पथकातील मंडळ अधिकारी पी. डी. शिंदे हे हायवात चढले आणि त्यांनी तो हायवा घनसावंगीकडे कारवाईसाठी नेण्यास सांगितले. मात्र, तितक्यात एका खाजगी जीपमधुन (एमएच १२ केवाय ८८१२) ८-१० जण आणि दुचाकीवर काही लोक घटनास्थळी पोहोचले. त्यांनी महसुल पथकातील कर्मचाऱ्यांना मारहाण करण्यास सुरुवात केली. यावेळी श्री. शिंदे यांनाही हायवातुन खाली ढकलण्यात आले. इतकेच नव्हे तर या हल्लेखोरांनी पथकावर दगडफेक करून अनेकांना मारहाण केली. या प्रकारामुळे पथक जीव मुठीत घेवुन पळत होते. याच गडबडीत वाळूमाफियांनी पथकाने ताब्यात घेतलेला हायवा पळवून नेला. दरम्यान, या घटनेची माहिती तत्काळ तहसिलदारांना देण्यात आली असता त्या घटनास्थळी पोहोचल्या होत्या. या हल्यात श्री. शिंदे यांच्यासह इतर कर्मचारी जखमी झाले आहे.


**जाहिर प्रगटन**

**मा. श्री.व्ही.सी. जोशी १ ले दिवाणी न्यायाधीश क. स्तर बीड ता. जि. बीड यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज नंबर २३१/२०२५**

**ॲड. आर. आर. शिंदे यांच्या मार्फत**

**चक्रधर रावसाहेब गिरे व इतर वि. निरंक**

ज्यापेक्षा रावसाहेब दामोधर गिरे, हे दिनांक २६.०६.२०२१ रोजी रा. लिंबागणेश, ता. जि. बीड येथे मयत झालेले आहेत, आणि तसेच अर्जदार १) चक्रधर पि. रावसाहेब गिरे, वय ३६ वर्षे, धंदा शेती, रा. लिंबागणेश, ता.जि. बीड. २) कृष्णा पि. रावसाहेब गिरे, वय ३० वर्षे, धंदा शेती, रा. लिंबागणेश, ता.जि. बीड.३) विमलबाई भ्र.रावसाहेब गिरे, वय-७२ वर्षे, धंदा घरकाम, रा. लिंबागणेश, ता. जि. बीड. ४) पूनम भ्र.प्रजितकुमार भोंडवे, वय-३० वर्षे, धंदा घरकाम, रा. डोमरी ता. पाटोदा, जि.बीड ५) धनश्री दिपक कोरडे, वय ३२ वर्षे, धंदा घरकाम, रा. दुबे कॉलनी, खंडवा जि. खंडवा (मध्यप्रदेश). ६) भाग्यश्री भ्र. सुशिल लगास, वय ३३ वर्षे, धंदा घरकाम, रा. लिंबागणेश, ता. जि. बीड.

अर्जदार क्र. १ व २ हे मयत रावसाहेब दामोधर गिरे, यांचे मुले आहेत तर अर्जदार क्र. ३ ही मयताची पत्नी असून, अर्जदार क्र. ४ ते ६ या मयताच्या विवाहीत मुली आहेत. मयताची आई सुमनबाई भ्र.दामोधर गिरे ही दि. २७.३.२०१५ रोजी मयत झाली आहे. या अर्जदारा व्यतीरिक्त मयतास इतर दुसरे कोणीही वारस नाहीत. असे वरील अर्जदारांचे म्हणणे आहे. वरील अर्जदार यांनी ते मयताचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र त्यांच्या हक्कात मिळण्यासाठी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

त्यापेक्षा सदरहू अर्जदार मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्यांचे आत, त्यांनी हया कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट, सदरहू अर्जदारांच्या हक्काबददल लागलीच पुरावा घेऊन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास, त्यांना/अर्जदारांना सदरहू मयत रावसाहेब दामोधर गिरे, यांचे वारस असल्या बाबतचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी.

**प्रकरणाची पुढील तारीख १८/०३/२०२५ आहे.**

**आज दिनांक ०५ फेब्रुवारी २०२५ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्कानिशी दिले.**

आदेशावरून

स्वाक्षरित
**क लिपीक**

शिक्का

स्वाक्षरित
**अधिक्षक**
दिवाणी न्यायालय व. स्तर बीड


# सुगंधकुट्टी बुद्धविहार येथे रंगला यशस्वीतांचा सत्कार सोहळ

## इंजि. राजू जगतकर, आरती बोकरे,आनंद बनसोडे यांच्या कर्तुत्वाचा सत्कार



परळी। प्रतिनिधी

सुगंधकुटी बुद्धविहार येथे दर रविवारी बुद्ध वंदेनेचा कार्यक्रम आयोजित केला जातो.त्या दिनाचे औचित्य साधून परळी शहरातील भिमनगर,जगतकर गल्ली येथील सुगंधकुटी बुद्ध विहार येथे परळीची भूमिपुत्र असलेले इंजि.राजू जगतकर, आरती बोकरे व आनंद बनसोडे या आपल्या कर्तुत्वाने, यशस्वी होऊन सिद्ध केलेल्या मान्यवरांचा दि.९ फेब्रुवारी रोजी येथील सुगंधकुट्टी बुद्ध विहार येथे सत्कार करण्यात आला. सुरुवातीला बुद्ध वंदना घेऊन व डॉ. बाबासाहेब आंबेडकर व माता रमाई आंबेडकर यांच्या प्रतिमेची अभिवादन करून भिमनगर येथील कु.आरती बोकरे हिची अन्न व औषध प्रशासन अधिकारी पदी नियुक्ती झाल्याबद्दल तसेच आनंद ज्ञानोबा बनसोडे यांची सहाय्यक पोलीस निरीक्षक पदी नियुक्ती झाल्याबद्दल व इंजि.राजू श्रावण जगतकर यांची दुबई येथे बुलेटट्रेनच्या ऑपरेशन मॅनेजर पदी भारत देशातून निवड झाल्या बद्दल शाल पुष्पगुच्छ देऊन हृदय सत्कार करण्यात आला.

सत्कार ला उत्तर देताना कु.आरती बोकरे हिने या पदाचा समाजाच्या हितासाठी उपयोग करणार आहे. माझ्यासारखे यशस्वी विद्यार्थी आपल्या भागात घडविण्यासाठी मी या भागातील मुलांना व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यास कधीही तयार आहे. तर इंजि. राजू जगतकर यांनी उपस्थित पालकांना समजावून सांगितले की विद्यार्थी कुठल्याही कुठल्याही वळणावर यश की खेचून आणता येते परंतु त्यात सातत्य असणे गरजेचे आहे. यासाठी लवकरच वेगवेगळे शिबिरे व तज्ञ व्यक्तींची मार्गदर्शन व्याख्याने आपण या भागात ठेवणार आहोत असे सांगितले.

उपस्थित मान्यवरांच्या हस्ते यावेळी कु.आरती बोकरे करे हिचा सत्कार प्रा.डॉ.यशश्री बालासाहेब जगतकर, रंभा बालासाहेब जगतकर, ज्योती सारनाथ जगतकर, व लिंबूबाई वसंत बनसोडे, यांच्या हस्ते तर आनंद बनसोडे यांचा विलास आदोडे, उत्तम समुद्रे, वसंत बनसोडे, संजय जगतकर, राजेभाऊ जगतकर, आदीच्या हस्ते करण्यात आला तर इंजि.राजू श्रावण जगतकर यांचा सत्कार सोपान ताटे, मिलिंद बनसोडे, शंकरराव साळवे, अशोक जगतकर,एच.टी. वाघमारे यांच्या हस्ते करण्यात आला या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बौद्धाचार्य सिद्धार्थ जगतकर यांनी तर आभार प्रदर्शन अनिल मस्के यांनी मानले.

या कार्यक्रमास संपादक बालासाहेब सोपानराव जगतकर, श्रावणराव जगतकर, संपादक बालाजी जगतकर, प्रा. संघपाल समुद्र, प्रा.विलास रोडे, विनायक गडदे माजी मुख्याध्यापक,भानुदास जंगले, विकास जगतकर, यश जंगले,दीपक शिरसाट, विलास केदारे, दर्शन ताटे, राज जगतकर किरण तरकसे,अवचारे सुनील, गोदाम,कुणाल गोदाम, संकेत बनसोडे, अरविंद बनसोडे वैजनाथ बनसोडे, सुरेश घाडगे लक्ष्मण जगतकर,अपर्णा बनसोडे,वंदना जंगले, इत्यादी सह बालक, बालिका,महिला नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# विक्रमादित्य चंपावती महोत्सवाचे धुमधडाक्यात बक्षीस वितरण !

## ट्विनकलिंग स्टार स्कूल आणि आदर्श विद्यालय उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे महाकरंडकाचे मानकरी!

**बीड । प्रतिनिधी**

कलाकारांचा अनोखा महाकुंभ बनलेल्या कलावैभवसिद्ध बालेकिल्ल्याचा विक्रमादित्य चंपावती महोत्सवाचे बक्षीस वितरण काल रोजी मोठ्या धुमधडाक्यात संपन्न झाले असून १४ हजार सात बाल कलाकारांच्या सहभागामुळे चंपावती महोत्सव लिमका गिनीज बुकाच्या उंबरठ्यावर जाऊन पोहचला. चंपावती महोत्सवात दि. १ फेब्रुवारी पासून ते दि. ८ फेब्रुवारी पर्यंत नृत्य, नाट्य, संगीत, चित्रकला, रांगोळी अशा विविध स्पर्धा पार पडल्या. या सर्व स्पर्धांचे बक्षीस वितरण काल रोजी संपन्न झाले. ज्यामध्ये ३६४ विजेत्या बाल कलाकारांना पारितोषिके देण्यात आली. चंपावती महोत्सवात नृत्य, नाट्य, संगीत, चित्रकला, रांगोळी स्पर्धेत उत्कृष्ट सादरीकरण करत सर्वाधिक बक्षिसे मिळवणाऱ्या इंग्रजी माध्यमाती ट्विनकलिंग स्टार स्कूल आणि मराठी माध्यमातून आदर्श विद्यालयाने उपमुख्यमंत्री ना. एकनाथजी शिंदे महाकरंडकावर आपले नाव कोरले तर जेष्ठ संगीतकार भरत अण्णा लोळगे, नृत्यकर्मी सौ अनुराधा निकम, नाट्य कलावंत महेंद्र खिल्लारे, नृत्यकर्मी वैभवी टाकणखर आणि समाजसेवक डॉ गणेश ढवळे यांना चंपावती सन्मान या पुरस्काराने सन्मानीत करण्यात आले. महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री ना. एकनाथजी शिंदे साहेब आणि संसदरत्न खासदार डॉ श्रीकांतजी शिंदे साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त बीड कलाकार आणि शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप, सचिन भैय्या मुळूक आणि स्वप्नील गलधर यांच्या संकल्पनेतून साकार झालेला चंपावती महोत्सव लिमका गिनीज बुकमध्ये नोंद करून बीडचा नवा इतिहास रचण्यासाठी तयार झाला असून लवकरच लिमका गिनीज बुक टीमला पाचरण करणार असल्याची माहिती चंपावती महोत्सवाचे संस्थापक अध्यक्ष प्रतिक कांबळे यांनी दिली आहे. चंपावती महोत्सवाचे बक्षीस वितरणासाठी प्रमुख अतिथी राष्ट्रवादी नेते अमरसिंह पंडित आणि दै लोकाशाचे संपादक विजय बंब उपस्थित होते. याबरोबरच शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप, सचिन भैय्या मुळूक, स्वप्नील भैय्या गलधर तथा बीड जिल्हा शिवसेनेचे सर्व पदाधिकारी उपस्थित होते.







### १४ हजार सात बाल कलाकारांच्या सहभागामुळे चंपावती महोत्सवात लिमका गिनीज बुकाच्या उंबरठ्यावर!

### बाल कलाकारांच्या हक्काचा चंपावती महोत्सव कदापि बंद होऊ देणार नाहीत– जगताप, मुळूक, गलधर

चंपावती महोत्सव उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे महाकरंडक स्पर्धा आता आमची राहिलेली नसून ती जिल्ह्याभरातील बाल कलाकारांच्या हक्काची आणि जिव्हाळ्याची स्पर्धा बनली आहे. बाल कलाकार इथे एकत्रित येऊन कलेचा आविष्कार सादर करतात, बक्षीसे मिळवतात यामुळे कलाकार आणि शिवसेनेच्या प्रेमाचा हा उत्सव आम्ही कदापि बंद होऊ देणार नाहीत. चंपावती महोत्सव चंपावती महोत्सव एकनाथजी शिंदे महाकरंडक स्पर्धा वर्षनुवर्षे सुरु राहील आणि यातून हजारो कलाकार घडत राहतील व बीडचे नाव राज्याच्या आणि देशाच्या गाजत राहील असा निर्धार शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप, सचिन भैय्या मुळूक, स्वप्नील भैय्या गलधर यांनी आपल्या भाषांनातून केला.

### उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त बाल कलाकारांना रंगमंच मिळाला– अमरसिंह पंडित

कलाकारांचा बालेकिल्ला म्हणून बीड जिल्हा ओळखल्या जातो. याच बालेकिल्ल्यातील १४ हजार सात बाल कलाकारांना उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त रंगमंच मिळाला याचे मनस्वी समाधान आहे. विद्यार्थ्यांच्या कलेला वाव मिळावा म्हणून शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप, सचिनभैय्या मुळूक आणि स्वप्नील भैय्या गलधर यांनी चंपावती महोत्सवाचे सुंदर असे आयोजन केलेले आहे असे मत राष्ट्रवादीचे नेते अमरसिंह पंडित यांनी व्यक्त केले.

# मंत्री पंकजाताई मुंडे बार्शी नाका रेल्वे स्टेशनवर लक्ष घालणार, बार्शी नाका,इमामपुर रोड रेल्वेस्टेशन कृती समितीने घेतली भेट

**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्याच्या पर्यावरण मंत्री पंकजाताई मुंडे बीडच्या दौऱ्यावर आले होते या यावेळी बार्शी नाका रेल्वे स्टेशन कृती समितीच्या शिष्टमंडळाने पंकजाताई यांना भेटून निवेदन दिले आहे, निवेदनात म्हटले आहे की १) बार्शी नाका इमामपुर रोडवर रेल्वे स्टेशन (रेल्वे थांबा) करणे २) रेशन धान्य. खत. सिमेंट वॅगन द्वारे गोडाऊन मध्ये स्टोरेज करावे आणि बीडचे रेल्वे स्टेशन बार्शी नाका इमामपूर रोड प्रकाश आंबेडकर नगर येथेच मंजूर होते आहेत असे असतानाही सदर रेल्वे स्टेशन पालवन येथे म्हणजे बीड शहराच्या ७ ते ८ कि.मि. दुर बांधण्यात आले आहेत, त्यामुळे लोकांची गैरसोय झाली आहे, पालवन रेल्वे स्टेशनवरून नगरला जाण्यासाठी पन्नास रुपये लागणार आहेत तर बीड शहरातून पालवण स्टेशनवर जाणेसाठी शंभर ते दीडशे रुपये खर्च होणार आहेत म्हणून पालवन रेल्वे स्टेशन नागरिकांना परवडणारे नाहीत म्हणून बार्शी नाका इमामपुर रोडवर रेल्वे थांबा तरी करावे, रेल्वेची चाचणी यशस्वी झाली आहे रेल्वे मार्ग तयार असला तरी विद्युतीकरण होईपर्यंत बीड येथून प्रवासी रेल्वे वाहतूक सुरू होणार नाही मात्र तोपर्यंत रेशनधान्य. खते. सिमेंट वगैरेचे वॅगन द्वारे बार्शी नाका रेल्वे स्टेशनवर तैय्यार असलेले गोडाऊन मध्ये स्टोरेज करावे त्यामुळे रेल्वेचाच फायदा होईल, बार्शी नाक्यावरून मोंढा. कृषी उत्पन्न बाजार समिती. एमआयडीसी. आठवडी बाजार. आडत मार्केट. बस स्टॅन्ड. जिल्हाधिकारी कार्यालय. तहसील कार्यालय. समाज कल्याण ऑफिस. जिल्हा रुग्णालय. एसपी ऑफिस. जिल्हा न्यायालय. शासकीय दूध डेरी. महिला रोगणालय. जिल्हा क्रीडांगण आणी जवळपास ९५ टक्के शाळा महाविद्यालय हे बार्शीनाका इमामपुररोड रेल्वे स्टेशनवरून जवळ आहेत तसेच चारो दिशेने हायवे रोड असल्यामुळे इमामपुर रोड बार्शी नाक्यावर ट्राफिक होणार नाही विशेष म्हणजे बार्शीनाका इमामपुर रेल्वे स्टेशनवर रेल्वेत बोर्डाने जमीनी खरेदी करून चार मोठ्या बिल्डिंग तैय्यार केलेले आहेत म्हणूनच बार्शी नाका इमामपुर रोडवर रेल्वे स्टेशन (रेल्वे थांबा) करावे अशी नम्र विनंती बार्शी नाका इमामपुर रोड कृती समितीच्या वतीने करण्यात आली आहे, यावेळी कृती समितीचे अध्यक्ष गम्मत भाऊ भंडारी, कार्य अध्यक्ष खुर्शीद आलम, सुशिला ताई मोराळे, बी.बी.जाधव, अमरत सारडा, सुनील सुरवसे, संजय उडान, डॉ.लक्ष्मण ढवळे,एम.डी.जाधव, सुधीर भांडवले, राजु जोगदंड, गोरख शिंगण, जाकेर भाई, अमोल पउळ,नबील उजमा, रुपेश पंडित, अविनाश झांबरे, मुबीन जुबेरी, महेश शिंगण,शफिक तांबोळी, सुशिल गुंजाळ,रफिक पटेल, रमेश भालशंकर, वजीर अत्तार, अमोल अहिरे,सोनु पटेल आदी मान्यवर उपस्थित होते,



# श्रीरामपूर येथील कुरेशी जमात ट्रस्टच्या वतीने सादीक कुरेशी यांना समाजभूषण राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित

**म्हसोबावाडी । प्रतिनिधी**

आष्टी शहरातील माजी नगरसेवक तथा सामाजिक कार्यकर्ते सादीक कुरेशी हे गेल्या ४० वर्षांपासून सामाजिक क्षेत्रांमध्ये कार्यरत असून शहरातील यात्रा उत्सवात सहभागी व अनेक सामाजिक, राजकीय व युवक,गोरगरीब सर्वसामान्यांच्या, विविध घटकांतील प्रश्न वेळोवेळी सोडविण्यासाठी सातत्याने प्रयत्न करत असल्याने त्यांना सामाजिक कार्यात केलेल्या उल्लेखनीय कामगिरीची दखल श्रीरामपूर येथील कुरेशी जमात ट्रस्टच्या वतीने शनिवार दि ८ फेब्रुवारी रोजी आयोजित समाजभूषण गौरव पुरस्कार २०२५ पुरस्काराने सन्मानित करण्यात आलं आले. अहिल्यानगर जिल्ह्यातील श्रीरामपूर येथील कुरेशी जमात ट्रस्टच्या वतीने विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या व्यक्तींना शनिवारी पुरस्कार देण्यात आला आहे. या अनुषंगाने आष्टी येथील माजी नगरसेवक सादीक कुरेशी यांनी गेल्या ४० वर्षांपासून सामाजिक, राजकीय विविध घटकांतील सामाजिक कार्याची दखल घेऊन सादीक कुरेशी यांना समाजभूषण पुरस्कार कुरेशी जमात ट्रस्टचे अध्यक्ष महेबुब कुरेशी, उपाध्यक्ष कय्यूम कुरेशी, सेक्रेटरी हारून कुरेशी, माजी नगरसेवक कलिम कुरेशी यांच्या हस्ते देऊन सन्मानित करण्यात आले.सामाजिक कार्यकर्ते माजी नगरसेवक सादीक कुरेशी यांना समाजभूषण राज्यस्तरीय पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



# बीड शहरातील नगर रोडच्या डिव्हायडरच्या कामाला सुरुवात

## कार्यकारी अभियंता आणि ॲड. देशमुख यांनी केली संयुक्त पहाणी

**बीड । प्रतिनिधी**

**बीड शहरात छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्यापासून ते चऱ्हाटा फाट्यापर्यंत सिमेंट रोडचे काम चालू आहे. छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्यापासून आज या रोडवर डिव्हायडर बसवण्याचे काम सुरू झाले आहे. या कामासह रस्त्याच्या कामाची आज नॅशनल हायवेचे कार्यकारी अभियंता श्री. भोपळे आणि जन आंदोलनाचे विश्वस्त ॲड. अजित देशमुख यांनी संयुक्त पाहणी केली.**

डिव्हायडरच्या कामाला आज सुरुवात करण्यात आली. त्याचप्रमाणे येत्या पंधरा दिवसात नगर नाक्यापर्यंतचा रस्ता वापरासाठी पूर्णपणे खुला होईल. आणि उर्वरित कामाला सुरुवात होईल. त्याचप्रमाणे थेट चराटा फाट्यापर्यंत दोन महिन्यात काम पूर्ण करण्याचा प्रयत्न असल्याचे यावेळी इंजिनियर भोपळे यांनी ॲड. देशमुख यांना सांगितले.



गेल्या काही महिन्यांपासून या रस्त्याचे कामकाज चालू आहे. मात्र आता या कामाने गती घेतली आहे. त्याचप्रमाणे एका बाजूने रस्ता चालू झाल्यानंतर दुसऱ्या बाजूने काम करणे अधिक सोपे होणार असल्याने कामातील गती वाढणार असल्याचे कार्यकारी अभियंत्यांचे म्हणणे आहे.

या चालू असलेल्या कामाच्या गुणवत्तेबाबत ॲड. देशमुख यांनी समाधान व्यक्त केले. बीड शहरासाठी हा रस्ता अत्यंत महत्त्वाचा असून या रस्त्यावरील अतिक्रमणे रोखणे देखील काळाची गरज आहे. रस्त्याचे काम पूर्ण झाल्यानंतर एकही अतिक्रमण होऊ नये, यासाठी नॅशनल हायवे अथोरिटीने दक्षता घ्यावी, असेही ॲड. अजित देशमुख यांनी यावेळी सांगितले.

# व्यक्तिमत्व विकासासाठी खेळ महत्त्वाचा

## भारतीय महिला खोखो टिम विश्वचषक स्पर्धा विजेती कर्नधार प्रियंका इंगळे यांचे प्रतिपादन

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

येथील योगेश्वरी महाविद्यालयाच्या स्नेहसंमेलनाच्या निमित्ताने उद्घाटन प्रसंगी भारतीय खो-खो विश्वचषक विजेत्या महिला संघाच्या कर्णधार प्रियंका इंगळे यांनी उद्घाटक म्हणून उपस्थित राहून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. येथून जवळच असलेल्या कळंबअंबा या खेड्यातून आलेल्या कुटुंबातून प्रियंकाने देशाचे नेतृत्व करत कमी वयात यश संपादन केले आहे. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून योगेश्वरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा.चंद्रशेखर बर्दापूरकर हे उपस्थित होते त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत असताना हा विद्यार्थ्यांचा जडणघडणीचा काळ आहे विविध क्षेत्रात यश मिळवायचे असेल तर मेहनत व चिकाटी यांच्या माध्यमातून योग्य मार्गदर्शन घेऊन आतापासूनच तयारीला लागा असे आवाहन करत प्रियंका इंगळे यांच्यापासून आपण हीच प्रेरणा घ्यावी असे आवाहन केले.स्नेहसंमेलनाच्या निमित्ताने कळंब येथील प्रख्यात कवी प्रा.शेखर गिरी, युवा गझलकार सचिन क्षीरसागर हेही याप्रसंगी उपस्थित होते. त्यांनी विविध कविता, मराठी गझल व शेरोशायरी सादर करत विद्यार्थ्यांना अंतर्मुख केले. संस्थेचे उपाध्यक्ष श्री.गणपत व्यास गुरुजी यांनीही एक उदबोधनपर कविता सादर केली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एम. व्ही. कानेटकर यांनी केले.

याप्रसंगी व्यासपीठावर संस्थेचे सचिव कमलाकरराव चौसाळकर, कार्यकारी उपाध्यक्ष ॲड. जगदिश चौसाळकर, संचालक माणिकराव लोमटे,अंगदराव कराड, प्रताप पवार, रमन सोनवळर, माजी आमदार रोमन साठे, उपप्राचार्य डॉ. आर. व्ही. कुलकर्णी, स्नेहसंमेलन प्रमुख प्रा. डॉ. अनिल नरसिंगे, गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ.व्ही.जी. कळलावे उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन कु. श्रावणी तारसे, कु.दिव्या पौळ, कु.वैष्णवी जाधव यांनी केले.आभार प्रदर्शन स्नेहसंमेलन प्रमुख डॉ. अनिल नरसिंगे यांनी केले.उद्घाटन प्रसंगी महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# पालिकेच्या नूतन इमारतीत पत्रकारांना स्वतंत्र कक्ष निर्माण करा

### आयुक्त खांडेकर यांनी घेतला मंजुरीचा निर्णय

**जालना । प्रतिनिधी**

शहर महानगरपालिकेच्या इमारतीचे विस्तारिकरणाचे काम सुरु असून या नूतन इमारतीत पत्रकारांना बसण्यासाठो स्वतंत्र प्रतीक्षालंयाची स्थापणा करण्याची मागणी व्हॉइस ऑफ मिडिया जाकणाच्यावतीने करण्यात आली आहे. विशेष म्हणजे मनपा आयुक्त संतोष खांडेकर यांनी व्हॉइस ऑफ मिडियाच्या या रस्ता मागणीला लगेचच मंजुरी दिली आहे.

याबाबत आयुक्ताना दिलेकता निवेदनात म्हटले आहे की, शहरात महानगरपालिका स्थापण झाली असून, यासाठी इमारतीचे विस्तारिकरण सुरु असून यात स्वतंत्र कक्षा, ज्यामध्ये वार्ताकनासाठी टीव्ही संच, मिटिंग टेबल, आरामदायी खुर्च्या, वातानूकुलीत व्यवस्था, पाण्याची व्यवस्था करण्यात यावी. याशिवाय विविध वर्तमानपत्रे सुद्धा उपलब्ध करावीत. जालना शहर महानगरपालिका हद्दीत पत्रजर भवनासाठी सुद्धा करार तत्वावर जागा उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली आहे. यावेळी व्हॉइस ऑफ मीडियाचे मराठवाडा उपाध्यक्ष, अविनाश कवळे, जिल्हाध्यक्ष, राजेश भालेराव, सचिव रविकांत दानम, कोषाध्यक्ष अशोक मिश्रा, साप्ताहिक विंगचे जिल्हाध्यक्ष सुयोग खर्डेकर, लियाकत अली खान, भरत मानकर, सदानंद देशमुख, विष्णू कदम, हुसेन कादरी, शिवाजी बावणे यांची उपस्थिती होती.



# अध्यापक महाविद्यालयाचे सराव पाठ संपन्न



**म्हसोबावाडी । प्रतिनिधी**

शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यापक महाविद्यालय आष्टी जिल्हा बीड येथील व्दितीय वर्ष प्रशिक्षणर्थ्यांचे वार्षिक पाठ छत्रपती शिवाजी विद्यालय आष्टी या ठिकाणी दिनांक ५/२/२०२५ ते ८/२/२०२५ या दरम्यान पार पडले. सर्व प्रशिक्षार्थ्यानी अतिशय उत्कृष्ट पाठ घेतले. त्यांना प्राचार्य केदार सर, प्रा जाधव सर यांचे विशेष मार्गदर्शन लाभले. महाविद्यालयाचे प्रा. बोडखे, प्रा.निशिगंध. श्री आडकर सर, श्री. दिपक शिंदे यांनी अंतर्गत परीक्षक म्हणून काम पाहिले तर छत्रपती शिवाजी विद्यालय येथिल ◀◀ पान ३ वर

# संत रविदास महाराज व संत कंकैय्या महाराज जयंती महोत्सवास उपस्थित रहा– हरिभाऊ सवणे

**माजलगाव । प्रतिनिधी**

तालुक्यात गेल्या ३५ वर्षापासून संत शिरोमणी गुरु रविदास महाराज व संत कंकैय्या महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात येत आहे यावर्षी सार्वजनिक एकत्रित जयंती महोत्सव साजरा करण्यात येणार आहे तरी या जयंती महोत्सवास उपस्थित राहावे असे आवाहन जयंती कमिटीचे अध्यक्ष तथा कृषी उत्पन्न बाजार समितीचे सचिव हरिभाऊ सवणे यांनी केले आहे.



प्रति वर्षाप्रमाणे याही वर्षी दिनांक १२ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी १०:३० वाजता छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे संत रविदास महाराज यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात येणार आहे तसेच या जयंतीनिमित्त पद्माकर कांबळे (पी.के.) यांच्या वतीने उपहार ची व्यवस्था करण्यात आली आहे या कार्यक्रमास अध्यक्ष म्हणून माजलगाव मतदार संघाचे आमदार प्रकाश (दादा) सोळंके उद्घाटक मोहन (दादा) जगताप हे लाभणार आहेत तसेच प्रमुख पाहुणे म्हणून सामाजिक व राजकीय क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहणार आहेत तरी तालुक्यातील सर्व समाज बांधवांनी या जयंती महोत्सवास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन जयंती कमिटीचे अध्यक्ष तथा कृषी उत्पन्न बाजार समितीचे सचिव हरिभाऊ सवणे, उपाध्यक्ष एड. गणेश,गवळी सचिव योगेश शिंदे, कार्याध्यक्ष भगवान सोनवणे, सदस्य वसंत वाघमारे, निमंत्रक राष्ट्रीय चर्मकार संघाचे जिल्हाध्यक्ष नानासाहेब घोडके व भाजपा अनुसूचित जाती जमाती उपाध्यक्ष सत्यनारायण उणवने आयोजक राजेश जाधव,सचिन कांबळे, सुभाष कांबळे, संतोष जाधव,प्रसाद वाघमोडे, आश्विन खंडागळे, राधाकिसन भाळशंकर, आकाश कांबळे, एड. दत्ता जाधव,विकी मराठे, प्रीतम जाधव,मयूर वाघमारे, संतोष खंडागळे,अर्जुन पोहेकर यांनी आवाहन केले आहे

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड–४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक–सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक – अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल – rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# आळंदीत वारकरी शिक्षण संस्थांची तपासणी पूर्ण
# सादर अहवालावर आळंदीकरांना कार्यवाहीची प्रतीक्षा

आळंदी । प्रतिनिधी

तीर्थक्षेत्र आळंदी मध्ये शालेय शिक्षणासमवेत वारकरी संप्रदायिक शिक्षण देण्यासाठी मोठ्या प्रमाणात बुवा मंडळींनी वारकरी शिक्षण संस्थांच्या नावाखाली व्यवसाय सुरू केला असून काही वारकरी शिक्षण संस्था मध्ये अनैसर्गिक लैंगिक कृत्य झाल्याच्या घटना समोर आल्या आहेत.

यात अनेक गुन्हे आळंदी पोलीस स्टेशनमध्ये दाखल करण्यात आले. यामुळे तीर्थक्षेत्र आळंदीची प्रतिमा मलीन झाल्याने स्थानिक नागरिक ग्रामस्थ यांनी प्रचंड नाराजी व्यक्त करीत आपली भूमिका जाहीर केली. अशा घटना या पुढील काळात होऊ नयेत तसेच या संस्था तात्काळ बंद करण्यात याव्यात अशी मागणी करून राज्य शासनाकडे विविध ठिकाणी निवेदन देऊन या प्रकरणी महिला आयोगाचे देखील लक्ष वेधले. राज्य महिला आयोगाचे अध्यक्ष रूपालीताई चाकणकर यांनी या आळंदीकरांनी दिलेल्या निवेदनाची दखल घेऊन तात्काळ आळंदीत संबंधित शासकीय खात्यांच्या अधिकाऱ्यांची बैठक घेतली. सदर बैठकीत या प्रकाराबद्दल तीव्र नाराजी व्यक्त करून तीर्थक्षेत्र आळंदी हे वारकरी संप्रदायाचे अधिष्ठान असल्याने येथील तीर्थक्षेत्राचे पावित्र्य जोपासणे हे ही तितकेच महत्त्वाचे असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर यांनी ४८ तासांत आळंदी पंचक्रोशीतील वारकरी संप्रदाया बरोबर शालेय शिक्षण देणाऱ्या संस्थांची तपासणी करून अहवाल सादर करण्याचे आदेश दिले. बुवा मंडळींच्या माध्यमातून अनाधिकृत शिक्षण संस्था चालविल्या जात असल्याचे निदर्शनास आल्यामुळे आळंदीकर ग्रामस्थांनी वारकरी शिक्षण संस्था तात्काळ



बंद करण्यात याव्यात यासाठी मागणी करून निवेदन दिले होते. त्यावर दखल घेत अनधिकृत वारकरी संस्थांची तपासणी करण्यास दोन दिवस देवून अहवाल ८ फेब्रुवारी २०२५ पर्यंत सादर करण्याचे आदेश पुणे जिल्हाधिकारी यांनी दिले होते. त्याप्रमाणे २० समिती करण्यात आल्या होत्या. यात प्रत्येक समितीत दोन सदस्य आणि एक समिती अध्यक्ष नियुक्त करण्यात आले होते. यात महिला व बाल विकास विभाग, महसूल विभाग, गृह विभाग, शालेय शिक्षण विभाग, मुख्य कार्यकारी अधिकारी, आळंदी नगरपालिका यांची समिती गठित करण्यात आली होती. या समितीच्या माध्यमातून तीर्थक्षेत्र आळंदी पंचक्रोशीत चालविण्यात येणाऱ्या बालकांच्या वस्तीग्रह यांची समिती मार्फत अनधिकृत संस्थांची तपासणी करण्यात आली. या बाबतचा अहवाल ८ फेब्रुवारी २०२५ रोजी जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी पुणे यांच्याकडे सादर करण्यात आला असल्याचे मुख्याधिकारी कैलास केंद्रे यांनी सांगितले. या तपासणी साठी विविध नमुन्यात तपासणी अहवाल आणि अभिप्राय देण्याचे आदेश पुणे जिल्हाधिकारी यांनी दिले होते. त्याप्रमाणे आळंदी परिसरातील आळंदी चऱ्होली खुर्द आणि बुद्रुक, केळगाव, चोविसावाडी, डुडुळगाव या परिसरातील बुवा मंडळींच्या कडून सुरू असलेल्या अनधिकृत वारकरी शिक्षण संस्था यांची तपासणी करण्यात आली. समिती अध्यक्षांकडून स्वयं स्पष्ट अहवाल आणि अभिप्राय ८ फेब्रुवारी २०२५ रोजी पुणे जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांच्याकडे सुपूर्द करण्यात आला आहे. वीस समिती अध्यक्ष यांचे तील अध्यक्षांना संपर्क करण्यात आला होता. मात्र अनेकांचा संपर्क झाला नाही. ज्यांचा संपर्क झाला त्यांनी प्रतिक्रिया देण्यास नकार दिला. आळंदीत विविध संस्थांत तपासणी पथक समितीने भेट देत तपासणी केली असून धक्कादायक माहिती पुढे येत आहे. मात्र यास दुजोरा मिळत नाही. अधिकारी काही बोलण्यास धजत नाही. काही संस्थानची तपासणी झाली नसल्याचे बुवा मंडळी सांगतात. सरसकट तपासणी करणे आवश्यक असताना केवळ १७५ संस्था असल्याचे बोलत तेवढीच संख्या गृहीत धरून तपासणी करण्यात आली. अनेकसंस्थानची तपासणी झाली नसल्याने कोणाचे सांगण्यामुळे काही संस्था वगळण्यात आल्या. अशी चर्चा आळंदीत जोर धरू लागली आहे.

## ताथवडेत व्यावसायिकाची ४८ लाखांची फसवणूक

पिंपरी : फार्मासिटीकल कंपनीत गुतवणूक करण्यास सांगून बावधान येथील एकाची ४८ लाखांची फसवणूक करण्यात आली. ही घटना १ ऑगस्ट २०२१ ते ८ फेब्रुवारी २०२५ दरम्यान ताथवडे येथे घडली.

याबाबत २८ वर्षीय व्यावसायिकाने वाकड पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यावरुन उमेश मुनोत (रा. संत तुकाराम नगर, नवी सांगवी) असे गुन्हा दाखल झालेल्या आरोपीचे नाव आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फार्मासिटीकल प्रोडक्ट, सर्जिकल प्रोडक्ट, फास्ट मुव्हींग कंज्युमर प्रोडक्ट असा २२ लाख रुपयांचा गोडाऊनमध्ये स्टॉक व कंपन्यांना दिलेल्या परचेस ऑर्डरचे २४ लाख व इतर एक लाख ९९ हजार असे एकूण ४७ लाख ९९ हजार रुपये फिर्यादीकडून आरोपीने गुंतवणूक म्हणून घेतले. मात्र आरोपीने स्वतःच्या फायद्यासाठी या रक्कमेत अपहार केला. या प्रकरणाचा अधिक तपास वाकड पोलीस करीत आहेत.

## सराईत गुन्हेगाराकडून तब्बल ११ गुन्हे उघड


शिरूर । प्रतिनिधी

शिरूर पोलीस स्टेशन हद्दीत दुचाकी वाहने चोरून धुमाकूळ घालणाऱ्या सराईत गुन्हेगाराला शिरूर पोलीस स्टेशनच्या तपास पथकाने अटक केली. त्याच्याकडून मोटर सायकल चोरीचे तब्बल ११ गुन्हे उघडकीस आणून ६ लाख ६० हजाराचा ऐवज जप्त करण्यात आला आहे.

संतोष उर्फ शरद गजानन इंगोले (रा. पांगरी कुटे, जि. वाशिम, असे अटकेतील सराईत आरोपीचे नाव आहे. त्याला शिरूर प्रथमवर्ग न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने ९ फेब्रुवारीपर्यंत पोलीस कोठडी बजावली आहे. शिरूर पोलीस स्टेशनचे पोलीस पथक शिरूर शहर व पोलीस हद्दीतील मोटरसायकल चोरीच्या गुन्हयातील दुचाकींचा शोध घेतानाच पोलीस अंमलदार विजय शिंदे व नितेश थोरात यांना सराईत संतोष ऊर्फ शरद इंगोले याचा मोटर सायकल चोरीमध्ये सहभाग असल्याची महिती मिळाली. शिरूर पोलीस गुन्हे शोध पथकाचे पोलीस उपनिरीक्षक शुभम चव्हाण यांच्या पथकाने त्याला मालेगाव परिसरात सापळा रचून ताब्यात घेतले. आरोपीने शिरूर पोलीस स्टेशन १, घाड पोलीस स्टेशन, जि. बुलढाणा १, चाकण पोलीस स्टेशन १, भोसरी एमआयडीसी १, लोणीकंद १, खडकी १, आळंदी २, महाळुंगे १, दिघी व इतर एक, असे एकूण ११ गुन्हे केल्याची कबुली दिली असून, चोरीतील ११ दुचाकी ६ लाख ६० हजार रुपये किंमतीचा ऐवज जप्त केला आहे. हा आरोपी रेकॉर्डवरील सराईत गुन्हेगार आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक पंकज देशमुख, अप्पर पोलीस अधीक्षक रमेश चोपडे, उपविभागीय पोलीस अधिकारी प्रशांत ढोले, पोलीस निरीक्षक संदेश केंजळे यांच्या मार्गदर्शनाखाली शिरूर पोलीस गुन्हे शोध पथकाचे पोलीस उपनिरीक्षक शुभम चव्हाण, हवालदार नाथसाहेब जगताप, विशाल कोथळकर, पोलीस अमंलदार विजय शिंदे, नीरज पिसाळ, नितेश थोरात, अजय पाटील, सचिन भोई, निखील रावडे, रवींद्र आव्हाड यांनी केली आहे. पुढील तपास पोलिस निरीक्षक संदेश केंजळे यांच्या मार्गदर्शनाखाली हवालदार विशाल कोथळकर करीत आहे.

## कारचालकाला लुटणाऱ्या दोघांना सापळा रचून पकडले; पुणे पोलीसांची मोठी कारवाई

पुणे : राज्यात चोरट्यांनी धुमाकूळ घातला असून, राज्यातील वेगवेगळ्या भागातून चोरीच्या घटना उघडकीस येत असतात. अशातचं आता पुण्यातून एक मोठी बातमी समोर आली आहे. सॅलिसबरी पार्क परिसरात अपघात झाल्याची बतावणी करून कारचालकाला लुटणाऱ्या चोरट्यांना स्वारगेट पोलिसांनी अटक केली आहे.



रोहित सूर्यकांत कांबळे (वय २१), सागर शिवानंद जळकुटे (वय २४, दोघे रा. औद्योगिक वसाहत, गुलटेकडी ) अशी अटक करण्यात आलेल्यांची नावे आहेत. याबाबत ३८ वर्षीय व्यावसायिकाने स्वारगेट पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे. ही कारवाई स्वारगेट पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक युवराज नांद्रे, सहायक निरीक्षक राहुल कोलंबीकर, उपनिरीक्षक संतोष तानवडे, यांनी केली आहे. तक्रारदार व्यावसायिक ६ फेब्रुवारी रोजी सायंकाळी साडेपाचच्या सुमारास सॅलिसबरी पार्क परिसरातून मोटारीतून निघाले होते. त्या वेळी दुचाकीवरून कांबळे आणि जळकुटे आले. त्यांनी मोटारीला पाठीमागून धडक दिली. मोटारीचा वेग कमी झाल्यानंतर त्यांनी मोटारचालक व्यावसायिकाला अडवून वाद घालण्यास सुरुवात केली. अपघात झाल्याची बतावणी करून मोटारचालकाकडे नुकसान भरपाईपोटी पैशांची मागणी केली. मोटारचालकाने पैसे देण्यास नकार दिल्यानंतर आरोपींनी त्यांच्या गळ्यातील ४० हजारांची सोनसाखळी हिसकावून नेली. आरोपी कांबळे आणि जळकुटे पसार झाले. व्यावसायिकाने पोलिसांकडे तक्रार दिल्यानंतर तपास सुरू करण्यात आला. मोटारचालकाला लुटणारे चोरटे गुलटेकडीतील डायस प्लॉट परिसरात थांबल्याची माहिती पोलीस कर्मचारी सुजय पवार यांना मिळाली. त्यानंतर पोलिसांच्या पथकाने सापळा लावून दोघांना पकडले.

## झाडे वाचवण्यासाठी जमला हजारोंचा जनसमुदाय; बाणेर येथे हजारो नागरिकांनी मारल्या झाडाला मिठ्या..

बाणेर : केंद्र सरकारच्या नदी सुधार योजनेअंतर्गत सुरू असलेल्या कामांना स्थानिक नागरिकांसह पर्यावरण प्रेमी नागरिकांनी व संघटनांनी झाडांना मिठ्या मारून तीव्र विरोध दर्शविला. बाणेर येथील कलमाडी हायस्कूल ते मुळा राम नदी संगमापर्यंत पर्यावरण प्रेमी नागरिकांनी रॅली काढून तेथील असलेल्या झाडांना मिठी मारून चिपको आंदोलन केले.

यावेळी प्रसिद्ध अभिनेते सयाजी शिंदे, लद्दाख मधील पर्यावरण प्रेमी सोनम वांगचुक उपस्थित होते. या आंदोलनात हजारो नागरिकांनी सर्व वयोगटातील नागरिकांनी सहभाग घेतला. प्रशासकीय यंत्रणेला वारंवार सांगूनही या ठिकाणी सुरू असलेले काम बंद होत नाही. यामुळे या चिपको आंदोलनाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी पंतप्रधानांना या विषयात गांभीर्याने लक्ष घालण्यासाठी हा प्रकल्प पर्यावरणाच्या दृष्टीने घातक असल्याने बंद करण्यात यावा अशा आशयाचे हजारो पत्र लेखन करण्यात आले. त्याचबरोबर उपस्थित नागरिकांनी झाडाला मिठ्या मारून फोटो काढून



स्टेटस ठेऊन पर्यावरण जागृतीसाठी स्टेटसला ठेवण्यात आले. यावेळी शाळेतील मुलांनी पर्यावरण व नदी सुधारणेवर गाणे म्हणून जनजागृती केली. त्याचबरोबर अभिनेते सयाजी शिंदे यांनीही नदीवरील गाणी झुळझुळ नदीचे पाणी हे जनजागृतीसाठी म्हटले. नागरिकांमध्ये उत्साह वाढवण्याचं काम केले. यामध्ये नदीचे होत असलेले प्रदूषणाची व्यथा व गळचेपी या गाण्यातून मांडण्यात आली. विविध बॅनर व पोस्टर घेऊन या ठिकाणी पर्यावरण विरोधी होत असलेल्या कामाचा निषेध करण्यात आला. शहरातील नदीची परिस्थिती बिकट होत आहे. नद्या ह्या देशाच्या रक्तवाहिन्या असून त्या दूषित झाल्या तर देश दूषित होईल. नद्यांचा विकास म्हणजे त्याचा कॅनल करणे गटार करणे नाही. त्यामुळे मुळा रामनदी संगम परिसरातील विकास कामांना आळा बसेल. राज्य शासनाने, पुणे महानगरपालिकेने यासंदर्भात जरूर विचार करावा आणि नदीला जिवंत ठेवावे. असे पर्यावरण प्रेमी अभिनेते सयाजी शिंदे म्हणाले. आपल्याला जगण्यासाठी नदी वृक्ष यांची आवश्यकता असून ते वाचवण्यासाठी आपण सर्व एकत्र आलात याचा मला आनंद आहे अभिमान आहे आणि आपला आवाज लोकशाही मार्गाने राज्यकर्त्या पर्यंत पोहोचेल आणि ते यावर योग्य तो निर्णय घेतील अशी मला अपेक्षा आहे. श्वास आणि पाण्यापेक्षा कुठलीच गोष्ट महत्त्वाची नाही त्यामुळे पाणी आणि हवा वाचवण्यासाठी आज आम्ही एकत्र आलो आहोत. पर्यावरण वादी कार्यकर्ते सोनम वांगचुक म्हणाले. सत्ताधारी भारतीय जनता पक्षाच्या नेत्यांनी व कार्यकर्त्यांनी मात्र या आंदोलनाकडे पाठ फिरवल्याचे दिसून आले. परिसरात मोठ्या प्रमाणात नागरिक जमून देखील त्यांच्या भावना ऐकण्यासाठी सत्ताधारी भारतीय जनता पक्षातर्फे मात्र कोणीही उपस्थिती लावली नाही.

## पुणे विद्यापीठात उंदीरमामांचा सुळसुळाट, २ विद्यार्थ्यांना रेबीजची लक्षणे; विद्यार्थी संघटना संतप्त

पुणे । प्रतिनिधी

महाराष्ट्राची शैक्षणिक पंढरी समजल्या जाणाऱ्या पुणे शहरात लाखो विद्यार्थी आपल्या भविष्याची स्वप्न घेऊन पाऊल ठेवतात. येथील अनेक संस्था या विद्यार्थ्यांचं भवितव्य घडवतात, त्यांच्या आयुष्याला दिशा देतात, कलाटणी देतात. या शिक्षणसंस्थांपैकीच एक सर्वात मोठी आणि नामवंत शिक्षणसंस्था म्हणजे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ. मात्र, सध्या पुण्यातील हे नामवंत विद्यापीठ वेगळ्याच कारणाने चर्चेत आहे. येथील वसतिगृह क्र.६ मध्ये २ विद्यार्थ्यांना रेबीजची लक्षणे आढळून आली असूनया विद्यार्थ्यांच्या साहित्याची चक्क उंदरांकडून नासधूस झालेली आहे. त्यामुळे, विद्यापीठाच्या वसतीगृहातील उंदरांचा सुळसुळाट सध्या पुणे विद्यापीठ आणि पुण्याच्या शैक्षणिक वर्तुळात चर्चेचा विषय बनला आहे.



वसतिगृहातील विद्यार्थ्यांकडून गेल्या तीन महिन्यांपूर्वी मुख्य वसतिगृह प्रमुखांना याबाबत तक्रार सुध्दा दिलेली होती. तरीसुद्धा या विषयात विद्यापीठ प्रशासनाकडून कोणतीच दखल घेतलेली नाही. या सर्व गोष्टीवरून वसतिगृह प्रशासनाचा निष्काळजीपणा दिसून येतो, असा आरोप अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेने केला आहे. गेल्या तीन महिन्यांपासून हिंदी विभागाचे आणि अर्थशास्त्र विभागाचे विद्यार्थी मुख्य वसतिगृह प्रमुखांना भेटण्याचा प्रयत्न करत आहेत, तरी एकदाही या विषयाची दखल घेतली गेली नाही, असादेखील आरोप आता विद्यार्थ्यांकडून करण्यात आला आहे. वसतिगृहातील उंदरांनी एका विद्यार्थ्याच्या पायाला सलग चार वेळा चावा घेतला आहे. त्यामूळे, त्या विद्यार्थ्याला २ दिवस हॉस्पिटल दाखल केले होते. त्यामधे रेबीज या रोगाची लक्षणी आढळून आली आहेत. याशिवाय वसतिगृहातील विद्यार्थ्यांच्या खाण्याचे पदार्थ, कपडे आणि पुस्तकांचीही नासधूस उंदीर मामांनी केल्याचे विद्यार्थ्यांचे मत आहे. त्यामुळे, या विद्यार्थ्यांना त्वरीत नवीन रूम उपलब्ध करुन द्यावी, सर्व वसतिगृहात पेस्ट कंट्रोल करुन घ्यावे आणि स्वच्छते विषयी काळजी घ्यावी अशी मागणी एबीव्हीपीने केली आहे. तसेच, लवकरच लवकर दखल न घेतल्यास अखिल भारतीय विद्यार्थी परिषद तीव्र स्वरूपाचे आंदोलन करेल, असा इशारा देखील त्यांनी दिला आहे.

## समाजात पुन्हा एकत्र कुटुंब पद्धती रुजवण्याची गरज – राज्यमंत्री माधुरी मिसाळ ; आंबी येथील 'नव ताझ धाम' वृद्धाश्रमाचे उदघाटन

पुणे । प्रतिनिधी

काळ जसा बदलत गेला तशी विभक्त कुटुंब पद्धत वाढत गेली. पण एकत्र कुटुंब पध्दतीचे खूप फायदे आहेत त्याबद्दल तरुणांमध्ये जागरूकता निर्माण करायाल हवी असे मत राज्याच्या नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी व्यक्त केले. लायन्स क्लब ऑफ पुणे सारसबाग चॅरिटेबल ट्रस्ट संस्थेतर्फे तळेगाव एमआयडीसी जवळ असेल्या आंबी या ठिकाणी उभारण्यात आलेल्या 'नव ताझ धाम' या वृद्धाश्रमाचे उदघाटन रविवारी (दि.९) त्यांच्या हस्ते झाले.




यावेळी मावळचे खासदार श्रीरंग बारणे, लायन्स क्लब ऑफ पुणे सारसबाग चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष फतेचंद रांका, सदर प्रकल्पाचे देणगीदार रुखशाना व मेहेर अंकलेसरिया, प्रकल्पासाठी देणगी स्वरूपात जमीन उपलब्ध करून देणारे सुधीर नाईक, लायन्स क्लब ऑफ पुणे सारसबागचे प्रशांत कोठडिया, योगेश शाह, आशा ओसवाल, चैताली पटनी, अनिकेत आघाव, चेतक गुगळे व केअरिंग हँड्स संस्थेचे सचिव अंबादास चव्हाण आदी मान्यवर उपस्थित होते. सगळ्याच मुलांना आपले आई-वडील नकोसे असतात असे नाही. काही वेळेस, नोकरी, व्यवसाय, शिक्षण यामुळे आई वडिलांसोबत राहणे मुलांना शक्य होत नाही. अशा परीस्थितीत आपले आई वडील सुरक्षित अशा एखाद्या चांगल्या सुविधा असलेल्या वृद्धाश्रमात असले तर त्यांची नीट काळजी घेतली जाईल असा विश्वास मुलांना असतो. त्यामुळे चागल्या सोयी-सुविधा देणारे वृद्धाश्रम महत्वाचे ठरतात, असे मिसाळ म्हणाल्या. काळ जसा बदलत गेला तसे कुटूंब पद्धतीमध्ये बदल होत गेले. एकत्र कुटुंब पद्धतीमध्ये राहण्याचे अनेक फायदे असतात, ते नव्या पिढीला माहित करून देऊन पुन्हा एकदा आपल्याला एकत्र कुटुंब पद्धतीकडे वळावे लागणार अशी परिस्थिती निर्माण झाली असल्याचे मत देखील यावेळी माधुरी मिसाळ यांनी व्यक्त केले. एकत्र कुटुंब पद्धत असताना वृद्धाश्रमाची आवश्यकता नव्हती, पण वाढते नागरीकरण, बदलती संस्कृती यामुळे विभक्त कुटुंब पद्धत अस्तित्वात येत गेली. वृध्दाश्रम या संकल्पनेच्या आपण विरोधात आहोत. प्रत्येक आई-वडिलांना आपल्या मुलांना घडवण्यासाठी भरपूर कष्ट घ्यावे लागतात. त्यामुळे वृद्धापकाळात आई-वडिलांची काळजी घेणे ही मुलांची जवाबदारी आहे. पण काळ बदलतो आहे, शिक्षण, नोकरीच्या निमित्ताने मुलांना देश-विदेशात जावे लागत आहे, त्यामुळेच वृद्धाश्रम ही काळाची गरज बनली असल्याचे खासदार श्रीरंग बारणे यावेळी म्हणाले.

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त देहू येथे वृक्षारोपण

**पुणे । प्रतिनिधी**

शिवसेनेचे मुख्य नेते, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि शिवसेनेचे उपनेते, मावळचे खासदार श्रीरंग बारणे यांच्या वाढदिवसानिमित्त शिवसेना शाखा देहूगाव व रूक्षदायी प्रतिष्ठान यांच्या वतीने रुक्षरोपण करण्यात आले.



यावेळी खासदार बारणे यांच्यासह श्री तीर्थक्षेत्र देहू संस्थानचे अध्यक्ष पुरुषोत्तम महाराज मोरे, ह.भ.प माणिक महाराज मोरे, पंढरपूर देवस्थानचे विश्वस्त शिवाजी महाराज मोरे, देहूगाव शिवसेना शहरप्रमुख सुनिल हगवणे, ह.भ.प जालिंदर महाराज मोरे, माजी नगरसेवक गणेश हगवणे, देहूगावचे भाजप शहराध्यक्ष मच्छिंद्र परंडवाल, माजी उपसरपंच सचिन साळुंखे, शिवसेना महिला मावळ तालुका प्रमुख शुभांगी काळंगे, शिवसेना शहर संघटिका शितल पवार, माजी उपसरपंच संतोष हगवणे व नागरिक यावेळी उपस्थित होते. खासदार बारणे म्हणाले, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे सर्वसामान्यांचे नेते आहेत. जनतेशी समग्र होऊन काम करतात. राज्यातील जनतेला न्याय देण्याचे काम त्यांच्याकडून केले जाते. शिंदे यांचे पुणे जिल्ह्यातील विकास कामावर लक्ष असते. नगरविकास खात्याच्या माध्यमातून मावळ मतदारसंघासाठी मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करून देत आहेत. नगरविकास खाते, खासदार निधी आणि जिल्हा नियोजन समितीमधील मोठा निधी मावळच्या विकासासाठी खर्ची केला जात आहे. भविष्यातही मावळसह देहूच्या विकासासाठी निधी कमी पडू दिला जाणार नाही. देहू शहर मोठ्या प्रमाणात विस्तारत आहे. त्यामुळे देहूचा नियोजनबद्ध विकास झाला पाहिजे. त्यासाठी सर्वांनी पुढाकार घेण्याचे आवाहनही खासदार बारणे यांनी केले.

## जांभोरीत शनिवारी वक्तृत्व स्पर्धांचे आयोजन

भीमाशंकर, : जांभोरी (ता. आंबेगाव) येथील जांभोरी ग्राम विकास फाउंडेशन यांच्यावतीने शनिवारी (ता. १५) वकृत्व स्पर्धांचे आयोजन केल्याची माहिती जांभोरी ग्राम विकास फाउंडेशनचे अध्यक्ष पुनाजी पारधी यांनी दिली.

आदिवासी भागातील विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव मिळावा या उद्देशाने वक्तृत्व स्पर्धांचे आयोजन केल्याचे आयोजकांनी सांगितले. स्पर्धेसाठी ५ ते ७ व ८ ते १० असे दोन गट करण्यात येणार असून लहान गटाला निसर्ग माझा गुरू, लायन हार्ट होन्या केंगले, आई समजून घेताना, माझं स्वप्न, माझा गाव माझा अभिमान हे विषय ते मोठ्या गटाला पुस्तक सुधारते मस्तक, धरतीआबा बिरसा मुंडा, मोबाईल आपल्यासाठी की आपण मोबाईलसाठी?, माझा बाप माझा आधार, मी जंगलचा राजा असे विषय देण्यात आले आहेत. विजेत्या स्पर्धकांमध्ये प्रथम, द्वितीय, तृतीय व उत्तेजनार्थ असे क्रमांक काढण्यात येणार असून त्यांना अनुक्रमे ३ हजार, २ हजार, १ हजार व पाचशे रुपये याप्रमाणे पारितोषिक देण्यात येणार आहे. तरी आहुपे, तिरपाड, माळीण, असाणे, बोरघर, फुलवडे, गोहे खुर्द व बुद्रुक, पोखरी, राजेवाडी, तळेघर, जांभोरी, राजपूर, तेरूंगण, उगलेवाडी येथील विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत सहभागी होण्याचे आवाहन फाउंडेशनचे अध्यक्ष पुनाजी पारधी यांनी केले आहे.

## एमआयटी-एडीटीला 'खेलो इंडिया'साठी 'साई'ची मान्यता

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे येथील एमआयटी आर्ट, डिजाईन आणि टेक्नॉलॉजी विद्यापीठाला रोइंग या क्रीडा प्रकारासाठी प्रतिभावान खेळाडूंचा (मुले व मुली) शोध घेणे व त्यांना प्रशिक्षण देण्यासाठी भारतीय क्रीडा प्राधिकरण (साई) कडून खेलो इंडिया प्रशिक्षण केंद्र (निवासी) म्हणून मान्यता प्राप्त झाली आहे. अशाप्रकारे, क्रीडा क्षेत्रातील प्रतिष्ठित 'साई'ची मान्यता मिळणारे एमआयटी एडीटी विद्यापीठ हे राज्यातील पहिलेच विद्यापीठ ठरले आहे.

एमआयटी एडीटी विद्यापीठातील क्रीडा संकुल हे जागतिक सोईसुविधांनी सुसज्ज आहे. विद्यापीठातील डॉ. विश्वनाथ कराड एमआयटी स्पोर्ट्स अकादमीमध्ये राष्ट्रीय स्तरावरील प्रशिक्षकांकडून रोइंग, बॉक्सिंग व जलतरण या खेळांसाठी अकादमीची स्थापना करत



खेळाडूंना प्रशिक्षणाचे काम केले जाते. त्याच्या परिणामतः रोइंग अकादमीतील खेळाडूंनी आजवर राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताचे प्रतिनिधित्व करताना पदक जिंकूण विद्यापीठाच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला आहे. गतवर्षी विद्यापीठातील स्कूल ऑफ लॉ'चे प्रा.आदित्य केंदारींनी आशियाई इनडोअर रोइंग स्पर्धेत भारताचे प्रतिनिधित्व करत सुवर्णपदक पटकाविले होते. या कामगिरीनंतर विद्यापीठाचे कार्यकारी अध्यक्ष प्रा.डॉ.मंगेश कराड म्हणाले, विद्यापीठाच्या रोइंग अकादमीला आता खेलो इंडियासाठी साईची मान्यता मिळाल्याने या क्रीडा प्रकारात रुची असणाऱ्या पुणे व परिसरातील खेळाडूंना या खेळाच्या प्रशिक्षणासाठी हक्काचे ठिकाण उपलब्ध होणार आहे. या यशानंतर विद्यापीठाचे कुलगुरू प्रा.डॉ.राजेश एस., प्र.कुलगुरू डॉ.रामचंद्र पुजेरी, डॉ.मोहित दुबे, कुलसचिव डॉ.महेश चोपडे, क्रीडा विभागाचे संचालक प्रा.पद्माकर फड यांनी क्रीडा विभागाचे अभिनंदन केले आहे.